मा॰ नाबार्डचे तपासणी अधिकाऱ्यांनी नुकत्याच केलेल्या तपासणी अनुषंगाने मा॰संचालकाची सभा शुक्रवार दिनांक ५/२/२००० रोजी सकाळी १०.३० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील 'सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात बँकेचे अध्यक्ष मा॰श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

१. मा.श्री. सुनील केदार — अध्यक्ष
२. मा॰श्री. र.पां॰ गावंडे — संचालक
३. मा.श्री. भा.चं. शहाणे — ,,
४. मा.श्री. अ.रा. गुप्ता — ,,
५. मा.श्री. व.भा. वांढे — ,,
६. मा.श्री. अ.य. गुजर — ,,
७. मा.श्री. सं.लि. चोरे — ,,
८. मा.श्री. शा.ग. धवड — ,,
९. मा.श्री. वि.रा. हुलके — ,,
१०. मा.श्री. वि.वि. निमजे — ,,
११. मा.श्री. ना.र. जनिकाटे — ,,
१२. मा.श्री. ग.के. शाहरे — ,,
१३. मा.श्री. र.व्यं. निमजे — ,,
१४. मा.श्री. मु.भि. पन्नासे — ,,
१५. मा.श्री. अ.शं. धार्मिक — ,,
१६. मा.श्री. चं.तु. समर्थ — ,,
१७. मा. सौ. स्मितावाई कुंभारे — संचालिका
१८. मा. सौ. कु.ग. किमतकर — ,,
१९. मा.श्री. मनमोहन सेन, सहा॰ महाप्रबंधक नाबार्ड नागपूर.
२०. मा.श्री. वी.पी. सेनॉय सहा॰ महाप्रबंधक तपासणी अधिकारी नाबार्ड.
२१. मा.श्री. लक्ष्मीकांत दास, तपासणी अधिकारी, नाबार्ड
२२. मा.श्री. ए.एन. चौधरी — मुख्यव्यवस्थापक.

अनुपस्थित

१. मा.सौ. आशाताई महाजन — उपाध्यक्षा
२. मा.श्री. र.गो. बंग — संचालक
३. मा.श्री. त्र्यं. ल. कोल्हे — ,,
४. मा.श्री. आ.र. देशमुख — ,,

५. मा. श्री. वि. आ. राऊत संचालक
६. मा. श्री. श्रा. नि. निमजे "
७. मा. श्री. ब. श्रा. तायवाडे "
८. मा. श्री व. क. पारशिवनीकर "

सभेला सुरुवात करण्यापूर्वी मा. अध्यक्ष यांनी नाबार्ड तपासणी अधिकारी मा. श्री. वी. पी. सेनाय, सहा. महाप्रबंधक नाबार्ड मा. श्री. लक्ष्मीकांत दास नाबार्ड तपासणी अधिकारी तसेच मा. श्री सेन साहेब सहा. महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सभेला अनुपस्थित असलेल्या मान्यवरांचे उपस्थितीची नोंद घेण्यांत आली. यानंतर सभेचे कार्यवाहीस सुरुवात करण्यांत आली.

विषय क्रमांक १ - नाबार्डचे तपासणी अधिकारी यांनी केलेल्या बँकेच्या तपासणी अनुषंगाने चर्चा करणे.

ठराव क्रमांक १ - मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक १७ जानेवारी २००० पासून नाबार्डचे तपासणी अधिकारी यांनी दिनांक १.४.९७ ते ३१.३.९९ पर्यंतचे बँकेच्या परिस्थितीची तपासणी केली असून या कालावधीत त्यांनी बँकेच्या कांही निवडक शाखा व मुख्यकार्यालयातील कामकाजाची सुद्धा तपासणी केली आहे. मा. सरव्यवस्थापक यांनी नाबार्ड तपासणी अधिकारी यांना तपासणीत आढळून आलेल्या उणिवा व त्यांत सुधारणा करण्याचे दृष्टीने मार्गदर्शनपर चर्चा करण्यास विनंती केली.

त्यानुसार नाबार्ड अधिकारी अधिकारी श्री सेनाय यांनी चर्चेस प्रारंभ करतांना देशाच्या मध्यभागी असणाऱ्या विदर्भाची राजधानी म्हणून मिरवणाऱ्या वैभवशाली परंपरा लाभलेल्या नागपूर शहरांत येऊन आनंद झाल्याचे सांगितले. बँकेचे नियम व कायद्याप्रमाणे नाबार्डकडून जिल्हा बँकांची तपासणी होणे आवश्यक असल्याचे सांगून तपासणीमध्ये आढळून आलेल्या उणिवा व त्यांत सुधारणा करण्याचे दृष्टीने बँकेच्या माननीय संचालकाशी चर्चा केली जाणे हे सुद्धा फार महत्वाचे आहे.

तपासणी कालावधीमध्ये भागभांडवल, ठेवी, घेतलेले कर्ज, दिलेले कर्ज, गुंतवणूक यांत भरमसाठ वाढ झाल्याचे दिसून आले

आहे. यावरुन बँकेची आर्थिक स्थिती सुदृढ व मजबूल असल्याचे स्पष्ट आहे, असे सांगून तपासणी कालावधीचे दोन वर्षात ठेवी रुपये १९९.५ कोटीवरुन रुपये २४४.७ कोटी झाल्या आहेत. बँकेच्या ठेवी वाढणे म्हणजे बँकेवर लोकांचा विश्वास दृढ असल्याचे निदर्शक आहे. बँकेने घेतलेले कर्ज रु. ५.१३ कोटीवरुन रु. १४.४० कोटी झाले आहे. यांत १५% वाढ झाली आहे. याही पेक्षा जास्त वाढ व्हायला पाहिजे. कमी व्याजाचे पैसे घेऊन जास्त व्याजाने दिले जाणे आणि बँकेची आर्थिक स्थिती मजबुल राहणेकरिता ८०% वर वसुली व्हावी हे आवश्यक आहे. कर्ज व्यवहारांत रु. १२३.०० कोटी वरुन रु. १९६.०० कोटीपर्यंत वाढ झाली आहे. बँकेनी मागील तपासणीचे वेळी असलेला तोटा रु. २५.५३ लाख भरुन काढून बँक नफ्यांत आलेली आहे. ह्या बाबी सुस्थितील आर्थिक मजबुत पायावर बँक उभी असल्याचे द्योतक आहे.

बँक कर्ज व्यवहार करण्याकरिता व्यतिरिक्त करीत असलेल्या गुंतवणुकीत रु. ६६.६३ कोटी वरुन रु. ९३.२४ कोटीपर्यंत वाढ झालेली आहे. परंतु बँकेचा मुख्य उद्देश गुंतवणूक करणे हा नसून समाजातील गरिबांना कर्ज देऊन कर्ज वसुली वाढविणे हा आहे. बँकेच्या ठेवींचे बाबतीत चर्चा करतांना नाबार्ड अधिकारी म्हणाले की, बँकेच्या एकूण ठेवी पैकी मागील दोन वर्षाच्या तुलनेत कमी व्याजदराच्या बचत ठेवी कमी झाल्या असून जास्त व्याज दराच्या ठेवीत वाढ झालेली आहे. यामुळे कॉस्ट ऑफ डिपॉझीट मध्ये वाढ होऊन नफ्याचे प्रमाण कमी झाले आहे. नफ्याचे प्रमाणांत वाढ होणेकरिता व कॉस्ट ऑफ डिपॉझीट कमी राहणेकरिता कमी व्याजाच्या ठेवी जास्तीत जास्त मिळविणे आवश्यक आहे.

अतिरिक्त निधीचे संदर्भात चर्चा करतांना म्हणाले की, बँकेजवळ असलेल्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक कॉल डिपॉझीटमध्ये केली जाते. तथापी कॉल डिपाजीटवर मिळणारे व्याज हे ठेवीवर देण्यांत येणाऱ्या व्याज दरापेक्षा कमी असल्याने बँकेचे नुकसान होऊ शकते म्हणून अतिरिक्त निधी सरकारी प्रतिभूती खरेदी विक्री व्यवहाराकरिता उपयोगांत आणीत असून या व्यवहारातून आतापर्यंत फायदाच झाला असल्याचे दिसत आहे. असे असले तरी शेअर मार्केटवर होणाऱ्या आंतरराष्ट्रिय गतीविधीचे परिणामाचा अभ्यास करुन हा व्यवहार अधिक दक्षतेने हाताळणे आवश्यक आहे.

कर्ज व अग्रिमचे संदर्भात चर्चा करतांना नाबार्ड अधिकारी म्हणाले की, लघुकर्ज मध्यम मुदती कर्ज व गैरशेती कर्ज यांचे ठरुन दिलेले प्रमाण राखले पाहिजे. प्रसंगी एका फाईलमध्ये परिपत्रकाची संख्या

कर्ज धोरणांचे परिपत्रकांची व्यवस्थित ठेवलेल्या फाईलमध्ये जास्त होत असेल तर त्यांचे एक पुस्तक तयार करुन अद्यावत परिपत्रक फाईल ठेवली पाहिजे. निरनिराळ्या पिकांकरिता कर्जवाटपाचे दर वर्षातून एकदा मा. तज्ञ समितीद्वारे ठरविले जातात. तथापी निरनिराळ्या पिकांकरिता खरीप कर्ज वाटपाचे दर, वर्षातील डिसेंबर मध्ये तर रब्बीचे कर्ज वाटपाचे दर मे / जून मध्ये ठरावयास पाहिजे.

बँकेला सादर करण्यांत येणारी कमाल कर्ज मर्यादा पत्रके Properly Scrutinise होणे आवश्यक आहे शाखांमधील जींदगी रजिस्टरमध्ये दरवर्षी कर्जदाराने धारण केलेल्या जमीनीबाबत झालेल्या बदलाची नोंद होणे आवश्यक असतांना अशी बदलाची नोंद जिंदगी रजिस्टरला होत नाही. तरी जींदगी रजिष्टरमध्ये नोंदी होणे दरवर्षी होणे आवश्यक आहे.

कॅश क्रेडीट खात्यावरील व्यवहाराचे संदर्भात बोलतांना नाबार्ड अधिकारी म्हणाले की, खातेदारास मंजूर मर्यादेपेक्षा उचल देण्यांत येत असते. त्यामुळे ड्यु डेटला खातेदाराने व्याजाचा भरणा केला नाही तर व्याज थकित दिसते. यासाठी कॅश क्रेडीट खात्यावर उचल देतांना व्याज वसुलीसाठी आवश्यक मर्यादा ब्लॉक ठेवून बाकी रकमेची उचल देण्यांत यावी. यामुळे कॅश क्रेडीट खाते थकित होण्याची संभवता कमी राहील असे सांगितले. तसेच ज्या उद्देशाकरिता कॅश क्रेडीट मर्यादा मंजूर असलेल त्याच उद्देशाकरिता / कामाकरिता कॅश क्रेडीट रकमेचा उचल देण्यांत यावा. बँकेनी नागरी सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा केला आहे, त्यांना कॅश क्रेडीट मर्यादा सुध्दा मंजूर केल्या आहेत. परंतु त्यांचे चालू ठेव खाते त्याच ठिकाणी सुरु ठेवण्यांत आले आहे. अशा प्रकारे दोन खाते असल्याने दुरुपयोग होण्याची शक्यता असते. तेव्हा कॅश क्रेडीट कर्ज मंजूर केलेल्या संस्थाचे चालू ठेव खाते बंद करुन कॅश क्रेडीट खाते चालू ठेवावे त्याचप्रमाणे अशा संस्थांना कर्ज मंजूर करतेवेळी त्या संस्थांचा नाबार्ड तपासणी अहवाल मागवावा.

व्याज दराचे बाबतीत चर्चा करतांना नाबार्ड अधिकारी म्हणाले की, तपासणी कालावधीचे दोन वर्षात बँकेने चार वेळा व्याजदरांत बदल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यावरुन ठेवी मिळविण्यांत व कर्ज वाढविण्यात बँकेची जागरुकता दिसून येते. तथापी तीन किंवा सहा महिन्यामध्ये मिळालेल्या व दिलेल्या व्याजाबाबत माहिती घेऊन व्याजदरांत बदल केल्यामुळे बँक किती फायद्यात आहे. याबाबत तुलनात्मक

तुलनात्मक आढावा घ्यावयास पाहिजे.

विणकर संस्थांचे बाबतीत नाबार्ड अधिकारी म्हणाले की, या संस्थांचे कर्ज व्यवहारांत सुधारणा होणे आवश्यक आहे. विणकर संस्थांची कॅश क्रेडीट खाती योग्य प्रकारे हाताळले गेले नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अनुदानाची रक्कम जमा करून मर्यादांचे नुतनिकरण करण्यांत येते. यासाठी बँकेने मा. संचालकांनी विचार विनिमय करून योग्य पावले उचलणे गरजेचे आहे. आता तर शासनाने हमी सुध्दा काढलेली आहे. त्यामुळे या खात्यावर नियमित/उचल/भरणा करणाऱ्या संस्थानाच बँकेचे कॅश क्रेडीट मर्यादांचे नुतनिकरण करावे.

बँकेत शाखेने, मुख्य कार्यालयास व मुख्य कार्यालयाने शाखेस व्याज लावल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रत्यक्षांत नफा न वाढतां व्याज देणे, घेणेच्या नोंदी वाढतात. त्यासाठी सदर पध्दतीत सुधारणा करावी असे नाबार्ड तपासणी अधिकारी यांनी सुचविले.

बँकेच्या अतिरिक्त निधीमध्ये सरकारी प्रतिभुती खरेदी-विक्री करण्याचे व्यवहार सांभाळण्याकरिता नाबार्डकडून एखादा अधिकारी मिळावा म्हणून मा. अध्यक्ष महोदय यांनी विनंती केली असतां या कामाकरिता बँकेने अधिकारी नियुक्त करावा म्हणजे त्या अधिकाऱ्यांवर पगारापोटी व इतर साठी नाबार्ड खर्च देईल असे सांगून कर्मचाऱ्यांकरिता/अधिकाऱ्यांकरिता नाबार्डच्या प्रशिक्षणाच्या अनेक योजना आहेत. नाबार्ड प्रशिक्षणाचे आयोजन करून जिल्हा बँकेचे अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना नाममात्र फी आकारून प्रशिक्षणाकरिता पाठविण्याबाबत कळवित असते. त्याच प्रमाणे बँकेचे उपयोगाचे वर्कशॉपचे सुध्दा आयोजन करून बँकेचे अधिकाऱ्यांना सदर वर्कशॉपकरिता पाठविण्याबाबत कळवित असते असे नाबार्ड अधिकारी यांनी सांगितले. तरी प्रशिक्षणाच्या वर्कशॉपच्या बँकेचे अधिकारी/कर्मचारी यांना पाठवून फायदा घ्यावा.

मा. अध्यक्ष चर्चेत भाग घेतांना म्हणाले की, सध्या ठेवी रु.350.00 कोटी आहेत. त्या 31 मार्च 2000 अखेर रु.800.00 कोटी करण्याचा मानस आहे. त्याचप्रमाणे 16% ते 17% व्याजदराने ट्रॅक्टर घेणाऱ्या कर्जदार सभासदांना जे ट्रॅक्टर कर्जाचे नियमितपणे पूर्ण कर्जफेड करतील त्यांना 12% व्याजदराने व्याज आकारून सवलत देण्याची योजना तयार करीत असून ती कार्यान्वित करण्याकरिता येथा मा. संचालक मंडळाचे सभेत धोरणात्मक निर्णय घेत आहोत असे सांगितले.

शेवटी मा. नाबार्ड तपासणी अधिकारी श्री सेनाय, सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड यांनी तपासणी काळांत बँकेच्या अधिकारी व

कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

नाबार्डचे अधिकाऱ्यांनी बँकेची दिनांक १-४-१९९७ ते दिनांक ३१-३-१९९९ या कालावधितील घेतलेल्या तपासणीत आढळून आलेल्या उणिवा व त्या अनुषंगाने केलेल्या उपयुक्त सुचनांची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक २ - मा० अध्यक्ष यांचे परवानगीने येणाऱ्या विषयावर चर्चा करणे

विषय क्रमांक २(१) - कापूस एकाधिकार योजनेंतर्गत कास्तकारांना मिळालेल्या कापसाचे चेकचे तारणावर ८०% कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक २(१) :- मा० अध्यक्ष यांनी माहिती देतांना सांगितले की, कापूस एकाधिकार योजनेंतर्गत कास्तकारांनी आपला कापूस, कापूस उत्पादक मार्केटींग फेडरेशनला विकला आणि खरेदी विक्री संघाकडून त्यापोटी चेक्स देण्यांत आले. परंतु कापूस हुंड्या डिस्काउंट न झाल्यामुळे मिळालेल्या कापूस चेकची रक्कम कास्तकारांना मिळाली नाही. त्यामुळे कास्तकार फार अडचणीत आहेत. या अडचणीत कास्तकारांना मदत करावी ह्या दृष्टीने कॉटन चेकचे तारणावर कांही प्रमाणांत रक्कम कास्तकारांना उपलब्ध करुन देण्यांत यावी असे वाटते. त्यामुळे बँकेची वसुली होईल व कास्तकारांना कॉटन चेक तारणावर रक्कम मिळाल्याने त्यांची अडचण दुर होण्यास मदत होईल.

कास्तकारांच्या या समस्येचा विचार करुन बँकेकडे कॉटन चेकसह अर्ज करणाऱ्या कास्तकारांकडील वैयक्तिक चेकचे तारणावर ८०% कर्ज रक्कम १२% प्रती वर्ष व्याजदराने कास्तकारांना उपलब्ध करुन देण्यांत यावी. कापूस हुंड्या डिस्काउंट झाल्यानंतर कॉटन चेकचे तारणावर दिलेल्या कर्ज रकमेवरील १२% प्रति वर्ष दराने व्याजाची रक्कम (कमीत कमी एक महिन्याचे व्याज) प्रथम वसुल करावी व २०% पैकी व्याज वसुल करुन उरलेली रक्कम कास्तकारांच्या बचत ठेव खात्यात जमा करण्यांत यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर

बँकेचे मा० सरव्यवस्थापक यांनी मा० अध्यक्ष महोदय यांचे सुचनेवरुन चर्चेस उपस्थित असलेल्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

(signature) सरव्यवस्थापक

(signature) अध्यक्ष

दिनागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या; नागपूर.

बँकेच्या मा॰ संचालक मंडळाची सभा शुक्रवार, दिनांक ११.२.२००० रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयांतील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा॰ श्री॰ सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

| | | |
|---|---|---|
| १. | मा॰ श्री॰ सुनिल केदार | अध्यक्ष |
| २. | मा॰ सौ॰ आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा॰ श्री॰ र॰ गो॰ बेग | संचालक |
| ४. | मा॰ श्री॰ भा॰ चं॰ शहाणे | ” |
| ५. | मा॰ श्री॰ अ॰ रा॰ गुप्ता | ” |
| ६. | मा॰ श्री॰ व॰ भा॰ वोढे | ” |
| ७. | मा॰ श्री॰ अ॰ य॰ गुजर | ” |
| ८. | मा॰ श्री॰ चं॰ ह॰ कोल्हे | ” |
| ९. | मा॰ श्री॰ आ॰ र॰ देशमुख | ” |
| १०. | मा॰ श्री॰ सं॰ लि॰ चोरे | ” |
| ११. | मा॰ श्री॰ श्या॰ ग॰ धवड | ” |
| १२. | मा॰ श्री॰ वि॰ रा॰ हुलके | ” |
| १३. | मा॰ श्री॰ ना॰ र॰ जीभकाटे | ” |
| १४. | मा॰ श्री॰ वि॰ वि॰ निमजे | ” |
| १५. | मा॰ श्री॰ ग॰ के॰ शाहिर | ” |
| १६. | मा॰ श्री॰ र॰ त्र्यं॰ निमजे | ” |
| १७. | मा॰ श्री॰ ब॰ भा॰ तायवाडे | ” |
| १८. | मा॰ श्री॰ मु॰ श्रि॰ पन्नासे | ” |
| १९. | मा॰ श्री॰ अ॰ शं॰ धार्मिक | ” |
| २०. | मा॰ श्री॰ व॰ क॰ पाराशिवनीकर | ” |
| २१. | मा॰ श्री॰ चं॰ तु॰ समर्थ | ” |
| २२. | मा॰ सौ॰ स्मिताताई कुंभारे | संचालिका |
| २३. | मा॰ सौ॰ कुसुमताई किंमतकर | ” |
| २४. | मा॰ श्री॰ सुभाषराव धोटे, प्रतिनिधी, म॰रा॰सह॰बँक लिमि॰, मुंबई. | |
| २५. | मा॰ श्री॰ राजेश भुसारी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर. | |
| २६. | मा॰ श्री॰ वी॰ डी॰ शहाणे | कर्मचारी प्रतिनिधी |
| २७. | मा॰ श्री॰ ए॰ एन॰ चौधरी | सर व्यवस्थापक. |

अनुपस्थित

१. मा. श्री. र. पां. गावंडे - - संचालक
२. मा. श्री. वि. ना. राउत ,,
३. मा. श्री. श्री. नि. निमजे ,,
४. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर
५. मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१ सह. संस्था (बँक), नागपूर.
६. सहाय्यक महा-प्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
७. मा. विभागिय अधिकारी, म. रा. सह. बँक म. विभा. कार्या, नागपूर.
८. मा. श्री. एल. जी. चौधरी कर्मचारी प्रतिनिधी.

---

सभेला उपस्थितांचे स्वागत करुन विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कामकाजास मा. अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक १.१२.१९९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होउन मागील दिनांक १.१२.१९९९ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक १.१२.१९९९ रोजीचे सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. सभेत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ३ :- केंद्र शासन पुरस्कृत व महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार नविन राष्ट्रीय कृषि विमा योजनेचे अंमलबजावणी बाबत.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, भारतीय साधारण विमा निगमाच्या (जीआयसी) सहकार्याने १९८५ पासून राबविण्यांत येत असलेली केंद्र सरकार पुरस्कृत सर्वकष विमा योजना रद्द करून व्यापक स्वरुपाची

राष्ट्रीय कृषि विमा योजना सुरू केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार चालू रब्बी हंगामापासून सदर योजनेची अंमलबजावणी करायची आहे. ह्या योजनेची प्रमुख उद्दिष्ट खालील प्रमाणे सांगण्यांत आली आहेत.

(१) नैसर्गिक आपत्ती, किडी आणि रोगांमुळे पीकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण आणि आर्थिक सहाय्य देणे.

(२) शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे आधुनिक तंत्रज्ञान आणि उच्च प्रतिची सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे.

(३) पीकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितही ~~शेतक~~ शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधीत राखणे.

या योजनेअंतर्गत नुकसान भरपाई ठरविण्याची पद्धती, विमा हप्ता वसुल करावयाची पध्दती, कर्ज न घेणाऱ्या व कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांकरिता असणारी पद्धती, अधिक रकमेकरिता पीक विमा करून घेण्याची पद्धत सकल विमा प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक, शेतकऱ्यांच्या जबाबदाऱ्या, विमा कंपनीने पिकवार ठरविलेले दर इत्यादिबाबत माहिती देऊन ही, राष्ट्रिय कृषि विमा योजना राबविण्याबाबत महाराष्ट्र शासनाने निर्णय घेऊन चालु रब्बी हंगामापासून राबविण्यास कळविले आहे. पहिल्या वर्षी अन्नधान्य पीकांचा समावेश केला असून पुढील तीन वर्षात अन्य नगदी पीक / फळबाग यांचा समावेश करणार आहे. ही योजना वित्त संस्थाकडून पीक कर्ज घेणाऱ्या कर्जदार शेतकऱ्यांना सक्तीची राहणार असून बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छीक राहील.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पिकांना संरक्षण मिळावे व नैसर्गीक आपत्तीमुळे होणारी नुकसान भरपाई मिळावी याकरिता कर्जदार व बिगर कर्जदार सभासद शेतकऱ्यांकरिता केंद्राने पुरस्कृत केलेली व महाराष्ट्र शासनाने निर्णय घेऊन नविन राष्ट्रिय कृषि विमा योजना चालू रब्बी हंगामापासून राबविण्याकरिता कळविल्यानुसार नविन राष्ट्रिय कृषि विमा योजना राबविण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ४ :- सहकारी न्यायालयाकडून थकबाकी रकमेची वसूली होण्यासाठी बँकेला मिळालेल्या वसुली दाव्याचे (अवार्ड) कार्यवाहीबाबत...

ठराव क्रमांक ४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. सभेला माहिती देतांना सांगितले की, आपल्या बँकेला संलग्न असलेल्या कर्जदार संस्थाकडील थकित कर्जाच्या वसुलीसाठी बँकेने यांचेकडील थकित कर्जाचे

वसुलीकरिता सहकारी न्यायालय, नागपूर येथे लवाद दावे दाखल करुन अवार्ड प्राप्त केले आहे.

१. कृषक जीनींग प्रेसींग सहकारी संस्था मर्या; नरखेड.
२. श्रीराम सहकारी राईस मील चिचाळा, ता. रामटेक
३. पंजाब वुड वर्क्स इंडस्ट्रीयल कोऑप.सोसा. लि. नागपूर.
४. जयभोले शंकर आदिवासी औद्योगीक सह.संस्था मर्या; श्रोडेलाल.
५. नागपूर तालुका शेतकी खरेदी विक्री सह. संस्था मर्या, नागपूर.
६. आरती कॉपी व नोटबुक प्रोड्युसर कोऑप संस्था मर्या, नागपूर.
७. भिमसेन आदीवासी जंगल सहकारी संस्था मर्या. पवनी.
८. व्यंकटेश डाईंग व स्क्रिन प्रिंटींग वर्क्स औद्यो. सह. संस्था, नागपूर
९. तुळशी यंत्रमाग विणकर सहकारी संस्था मर्या; नागपूर.
१०. नागपूर जील्हा पेपर एक्सरसाईज बुक बाईडींग सह.संस्था, नागपूर
११. दुष्यंत डाईंग व प्रिंटींग वर्क्स औद्योगीक सह. संस्था, नागपूर.
१२. आदर्श मागासवर्गीय महिला औद्योगिक सह. संस्था मर्या. वाकोडी.
१३. उमेशकुमार बाळासाहेब गायधने रो. द्रा. यो. व त्यांचे जमानतदार
१४. बबन अण्णाजी ठाकरे मु.पो. कळमेश्वर व त्यांचे जमानतदार.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन थकीत कर्जाचे कर्ज वसुलीकरिता सहकारी न्यायालय, नागपूर कडून अवार्ड प्राप्त झाल्याप्रमाणे उपरोक्त संस्थांचे व वैयक्तिक कर्जदारांकडून थकित कर्ज वसुलीकरिता अवार्डचे माध्यमातून पुढील कार्यवाही करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५ :- बँकेच्या अद्यावत कर्जवसुलीचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक ५ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. सभेला माहिती देतांना सांगितले की, कर्ज वसुली प्रभावी होणेकरिता १९९९-२००० या वर्षामध्ये कर्जवसुली कृतीकार्यक्रम तयार करुन या कार्यक्रमाअंतर्गत कर्जदार सभासदांच्या संस्थावार कर्जमागणी याद्या कापूस संकलन केंद्र, साखर कारखाना, एकाधिकार ज्वार खरेदी केंद्र, कृषि उत्पन्न बाजार समिती इत्यादि ठिकाणी पाठवून सर्व कापूस संकलन केंद्रावर ग्रीन कार्ड्स उपलब्ध करुन देण्यांत आले आहेत.

थकबाकीदार कर्जदारांना त्यांचेकडील कर्जमागणीकरिता कर्ज मागणी सुचना पत्र, जप्तीपूर्व नोटीसेस सर्व थकबाकीदार सभासदांना पाठविण्यांत आल्या आहेत. कापूस संकलन केंद्रावर अवैध कापूस विक्रीस आळा —

घालण्यासाठी बँकेच्या निरिक्षकांच्या नियुक्त्या करण्यांत आल्या आहेत. कर्जवसुली जास्तीत जास्त व्हावी व कमीत कमी वेळांत जास्तीत जास्त सभासदांशी संपर्क साधता यावा यासाठी विशेष वसुली अधिकाऱ्यांना एक-एक जीप गाडी देण्यांत आली आहे. चालू वर्षी सोयाबीन, मिरची या पिकांची परिस्थिती असमाधानकारक असल्यामुळे वसुलीवर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. तरी सुध्दा बँकेची वसुली मोहिम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी तालुका स्तरावर वसुली सभांचे आयोजन मागील तीन महिन्यापासून करण्यांत येत आहे. तसेच ट्रॅक्टर, जीपचे थकित कर्जाचे वसुलीसाठी विशेष वसुली अधिकाऱ्यामार्फत कार्यवाही सुरू आहे. या वर्षी सोयाबीन, मिरची पिकांची परिस्थिती समाधानकारक नसतांना संत्रा सुध्दा मागील वर्षीचे रुपये १६१.३७ लाख वसुलीच्या तुलनेत यावर्षी माहे जानेवारी २००० अखेरीस एकूण वसुली रुपये ११५३.३२ लाख झालेली आहे.

विदर्भातील इतर जिल्हा सहकारी बँकांच्या कर्ज वसुलीच्या तुलनेत आपले बँकेची कर्जवसुली फक्त ६.६ टक्के आहे. वसुली समाधानकारक नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या जानेवारी २००० अखेरील कर्ज वसुलीचा आढावा घेण्यांत आला. व अधिकाधिक कर्जवसुलीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यांत यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६ :- सहकार क्षेत्राबाहेरील कर्ज पुरवठ्यास नाबार्डकडून क्रेडीट अथोरायझेशन देणेसाठी विनंती करणेबाबत..

ठराव क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, आपल्या बँकेच्या डिसेंबर १९९९ अखेर रुपये ३४४.८९ कोटिच्या ठेवी असून रुपये २२१.५५ कोटींची कर्जे दिलेली आहेत. बँकेने मंजूर केलेल्या कर्जाची पुरता व तरती जोंदणी विचारांत घेता बँकेकडे रुपये ४०.०० कोटी अतिरिक्त निधी शिल्लक आहे. व हा अतिरिक्त दिवसेंदिवस वाढत आहे.

ह्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे कॉल डिपाजीट व सरकारी प्रतिभूतीमध्ये केली जात आहे. परंतु यावर मिळणारा व्याजदर अत्यल्प आहे; त्यामुळे बँकेला व्याज कमी मिळते. पर्यायाने बँकेचे उत्पन्न कमी होते. नाबार्डने दिनांक १०।९।१९९९-चे पत्रानुसार ठेवींच्या आधारावर सहकारी संस्थाना कर्ज पुरवठा करण्यासाठी जिल्हा बँकांना परवानगी दिलेली आहे. यासाठी रुपये ३००.०० कोटीपर्यंत ठेवी

असल्यास रुपये १०.०० कोटी एवढी भांडवली कर्ज मर्यादा तर रुपये ३००.०० कोटीच्या वर ठेवी असल्यास रुपये १५.०० कोटी एवढी भांडवली कर्ज मर्यादा ठरवून दिली आहे. त्याप्रमाणे जिल्हा सहकारी बँकांना सहकार क्षेत्रातील सहकारी संस्थांना ठेवींच्या आधारावर कर्ज पुरवठा करण्यासाठी कर्ज मंजूरीचे अधिकार दिले आहेत त्याचप्रमाणे सहकार क्षेत्राबाहेरील संस्थांना कर्ज पुरवठा करण्याकरिता कर्ज मर्यादा मंजूरीचे अधिकार मिळा-ल्यास बँकेकडील अतिरिक्त निधीची सुरक्षित कर्जामध्ये गुंतवणूक करुन बँकेचे उत्पन्नात वाढ करता येईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या ठेवींच्या आधारावर सहकारी क्षेत्रातील संस्थांना कर्ज पुरवठा करण्यास दिलेल्या परवानगीप्रमाणेच बँकेचा अतिरिक्त निधी सुरक्षित ठिकाणी गुंतवून बँकेचे उत्पन्नात वाढ करता यावी यासाठी सहकारी क्षेत्राबाहेरील संस्थांना सुध्दा कर्ज मर्यादा ठरवून कर्ज पुरवठा करणेसाठी परवानगी मिळावी म्हणून नाबार्ड कडे विनंती करण्यात यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ८ :- मध्यम मुदती ट्रॅक्टर कर्ज वाटपाचे कर्ज धोरणात सुधारणा करणेसंबंधी निर्णय घेणेबाबत.

ठराव क्रमांक ८ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, ट्रॅक्टरच्या त्यावेळच्या किंमतीला अनुसरुन बँकेत प्रचलित असलेले ट्रॅक्टर कर्ज मंजूरीचे निकष निर्धारित केले होते. त्याच निकषाचे आधारे सेवा/सहकारी/विविध कार्यकारी सहकारी संस्थांमार्फत सभासदांना ट्रॅक्टर युनिटकरिता कर्ज वाटप मंजूर केल्या जाते. ट्रॅक्टरच्या किंमतीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून कर्ज परतफेडीचा कर्ज हप्ता सुध्दा वाढत आहे त्यामुळे सभासदांकडील ट्रॅक्टरचे कर्ज थकित होण्याचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

ट्रॅक्टरचे कर्ज वाटप घेणाऱ्या सभासदांची कर्जफेड क्षमता व बँक कर्ज हप्ता यांची व्यवस्थित सांगड बसविण्याच्या दृष्टीने दिनांक १९।०।२००० च्या कर्ज उपसमितीचे सभेने ट्रॅक्टर खरेदी धोरणात खालीलप्रमाणे सुचविलेल्या सुधारणा करण्यास या सभेत मान्यता देण्यात येत आहे.

१. किमान १० एकर बारमाही ओलिताची किंवा जमीन कमी पडत असल्यास संयुक्त कुटुंबातील जमीन गहाणात घ्यावी.

२. ट्रॅक्टर खरेदीसाठी सभासदाकडून २०% स्वगुंतवणूक घेऊन

८५% ऐवजी ८०% पर्यंतच कर्ज पुरवठा करावा.

या व्यतिरिक्त ट्रॅक्टरचे कर्जवाटपावर सोसायटी स्तरावर ५ टक्के हिस्से घेणेऐवजी १०% हिस्से घेण्यांत यावे. तसेच बँक ते संस्था व संस्था ते सभासद स्तरावर ट्रॅक्टरकरिता आकारण्यांत येणारा व्याजदर यापुढे अनुक्रमे १२% व १३% करण्यांत यावा असे चर्चेअंती ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ८ :- रोड ट्रान्सपोर्ट योजने अंतर्गत कर्ज वाटप धोरणांत सुधारणा करणेसंबंधी निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ८ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, रोड ट्रान्सपोर्ट योजने अंतर्गत प्रवासी बस, ट्रक, मीनी ट्रक, माळवाहू रिक्षा, प्रवासी वाहतुकीचा परवाना असलेली जीप, ऑटोरिक्षा, व्हॅन इत्यादिकरिता बँक कर्ज पुरवठा करीत असते. सद्याचे बँक धोरणानुसार सदर वाहनास ३ ते ५ वर्षे मुदतीचे कर्ज देतांना वाहनांचे किंमतीच्या ८५% पर्यंत कर्ज मंजूर करुन १५% स्वगुंतवणूक अर्जदाराकडून घेण्यांत येते. हा कर्ज पुरवठा वैयक्तिक स्वरुपाचा असल्यामुळे अर्जदारास संस्थेचे भाग खरेदी करावे लागत नाही. त्यामुळे केवळ १५% स्वगुंतवणुकीवर वाहन खरेदीकरिता कर्ज उपलब्ध होते. सदर कर्जावरील व्याजदर व अर्जदाराची स्वगुंतवणूक ह्या दोन्ही बाबी जवळपास सारख्याच असल्यामुळे सदर कर्जातर्गत वर्षभरांत अर्जदाराने जर कर्जाचे हप्ते मुदतीच्या आंत भरणा केले नाही तर व्याज वाढीमुळे वर्षभरातच वाहनाच्या किंमती एवढी कर्जाची रक्कम होते. त्याचप्रमाणे दरवर्षी होणारी वाहनाची झिज विचारांत घेतल्यास बँक कर्जास असलेली सुरक्षितता कमी होते.

अशा प्रकारची परिस्थिती विचारांत घेऊन दिनांक ३१।७।२००० चे कर्ज उपसमितीचे सभेत बँक कर्जाची सुरक्षितता वाढविण्याच्या दृष्टीने रोड ट्रान्सपोर्ट अंतर्गत सर्व वाहनाचे खरेदीकरिता १५% स्वगुंतवणूक ऐवजी वाहन किंमतीच्या २०% स्वगुंतवणुक घेऊन ८५% ऐवजी ८०% कर्ज उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेऊन रोड ट्रान्सपोर्ट कर्जातर्गत करावयाच्या धोरणात्मक बदलाचा प्रस्ताव मा० संचालक मंडळाचे आजचे सभेत ठेवण्यांत आला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दिनांक ३१।७।२००० रोजीचे सभेत निर्णय होऊन मा० कर्ज उपसमितीने शिफारस केलेल्या रोड ट्रान्सपोर्ट कर्जाअंतर्गत करावयाच्या धोरणात्मक बदलाचा प्रस्ताव मान्य करुन

रोड ट्रान्सपोर्ट अंतर्गत सर्व वाहनांचे खरेदीकरिता वाहन किंमतीच्या २०% स्वगुंतवणूक घेवून ८०% कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ९ :- मध्यम मुदती कर्जांतर्गत दुभती जनावरांचे कर्जदरांत नाबार्ड युनिटकॉस्टनुसार वाढ करण्याचे संदर्भात विचार करणे.

ठराव क्रमांक ९ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, जिल्ह्यातील ग्रामीण भागांत रोजगार उपलब्ध व्हावा शेतकऱ्यांना जोडधंदा मिळावा आणि जिल्ह्यातील दुधाचे उत्पादनांत वाढ व्हावी या दृष्टीने दुभती जनावरांकरिता बँक कर्ज पुरवठा करित असते कर्ज पुरवठा करण्याकरिता दुभती जनावरांचे कर्जदर, नाबार्डने सुचविलेले कर्जदर विचारांत घेऊन ठरविण्यांत येते. परंतु बाजारांत चांगली जनावरे खरेदी करतांना हे कर्जदर अपूरे पडत असल्यामुळे लाभार्थी सभासदांना मोठ्या प्रमाणांत स्वगुंतवणूक करावी लागत असल्याचे अनुभवास आलेले आहे. सध्याचे कर्जदर व बाजार किंमतीचा अंदाज घेतल्यास या दोहोमध्ये रुपये २०००/- ते रुपये ३०००/- चा फरक आढळतो.

नागपूर जिल्ह्यातील दुध उत्पादकांचा जर्सी गायी, मुऱ्हा म्हशी नागपूरी म्हशी या प्रकारातील दुभती जनावरे खरेदी करण्याचा कल लक्षांत घेऊन दिनांक ३१।१।२००० रोजी झालेल्या मा. कर्ज उपसमितीचे सभेने जनावरांचा प्रकार, बाजारांतील सरासरी दर, नाबार्ड युनिट कॉस्ट व बँकेचा सध्या असलेला दर विचारांत घेऊन सुधारीत कर्जदर ठरवून वाढीव दर लागू करण्यासंदर्भात मा. संचालक मंडळास शिफारस केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दिनांक ३१।१।२००० चे माननिय कर्ज उपसमितीचे सभेने शिफारस केल्याप्रमाणे मध्यम मुदती कर्जांतर्गत दुभती जनावरांचे कर्जदरांत नाबार्ड युनिट कॉस्टनुसार सुचविलेला सुधारीत बँक कर्जदर खालीलप्रमाणे मान्य करण्यांत आले आहे.

| अ.क्र. | जनावरांचा प्रकार | बाजारातील सरासरी दर | नाबार्ड युनिट कॉस्ट | बँकेचा सध्याचा दर | बँकेचा सुधारित कर्जदर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | जर्सी गाई | १५,००० | १४,००० | १२,५०० | १४००० |
| २ | मुऱ्हा म्हशी | १८,००० | १६,००० | १५,००० | १६००० |
| ३. | नागपूर म्हशी | १३,००० | १२,००० | ११,००० | १२००० |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १०:- ठेवी व कर्जावरील व्याजदरांत सुधारणा करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १०:- मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व ठेवी आणि कर्जावरील व्याजदरांत सुधारणा करणेबाबत सभेला माहिती दिली.

अ] दिनांक १८।९।१९९९ रोजीचे मा॰ संचालक मंडळाचे सभेतील निर्णयानुसार कर्जावरील व्याजदरांत बदल करून दिनांक १.१०।१९९९ पासून अंमलांत आणले होते. त्यानंतर कर्जावरील व्याजदराची माहिती विदर्भातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडून घेण्यांत आणि असून त्याबाबतचा अभ्यास केला असतां आपले बँकेतील कर्जावरील व्याजदरांत सुधारणा करणेची आवश्यकता निर्माण झाली आहे. कर्जावरील व्याजदरांत सुधारणा करणेबाबत करण्यांत आलेल्या शिफारशी बाबतची माहिती टिपणांत दिलेली आहे.

विषयावर चर्चा करतांना मा॰ श्री. पारशिवनीकर, संचालक म्हणाले, की, विणकर संस्थांचे हातमाग कॅश क्रेडीट कर्जावरील सद्याचे द.सा.द.शे. १०.५०च्या व्याजदरांत कार्यालयाने शिफारस केल्याप्रमाणे व्याज दर द.सा.द.शे. ११.०० न करता द.सा.द.शे. १०.५०-च कायम ठेवण्यांत यावा. व द.सा.द.शे. १०.५० हा जुनाच व्याजदर ठेवण्याबाबत मान्यता मिळावी म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या: मुंबई यांचे मार्फत नाबार्डला विनंती करण्यांत यावी असे सुचविले. यावर मा॰ अध्यक्ष यांनी सांगितले की, मा॰ संचालकांनी सुचविल्यानुसार व्याज दर कमी करण्याबाबत नाबार्डला व राज्य बँकेला विनंती करण्यांत येईल व त्याप्रमाणे व्याज दर कमी केल्यास कमी केलेला व्याज दर लागू करण्यांत येईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे कर्जावरील व्याज दरास मान्यता देण्यांत आली. व दिनांक १५।२।२००० पासून सुधारीत व्याज दर लागू करण्यांत यावे, असे ठरले.

| अ.क्र. | कर्जाचा प्रकार | द.सा.द.शे. व्याज दर. - सद्याचा दर - | | द.सा.द.शे. व्याज दर सुधारीत दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेने संस्थेस आकारावयाचा | संस्थेने सभासदास आकारावयाचा | बँकेने संस्थेस आकारावयाचा | संस्थेने सभासदांस आकारावयाचा |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| | शेती कर्जे - | | | | |
| १. | अल्प मुदती शेती कर्जे - खरीप, रब्बी, तेलबिया, ऊस व बागायती कर्जे - | | | | |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| | अ] रु.२५०००/- पर्यंत | १०.००% | १३.००% | १०.००% | १३.००% |
| | ब] रु.२५०००/- चेवर व रु.२.०० लाखा पर्यंत. | १०.००% | १४.००% | १०.००% | १४.००% |
| | क] रु.२.०० लाखाचेवर | १०.००% | १५.००% | १०.००% | १५.००% |
| | फक्त ऊसाचे कर्जावरील दर -- | | | | |
| | अ) रु.२५०००/- पर्यंत | ११.००% | १४.००% | ११.००% | १४.००% |
| | ब] रु.२५०००/- चेवर व रु.२.०० लाखा पर्यंत | ११.००% | १५.००% | ११.००% | १५.००% |
| | क] रु.२.०० लाखाचे वर | ११.००% | १५.००% | ११.००% | १५.००% |
| २ | मध्यम मुदती शेती, रूपांतर फेररूपांतर द्वितिय फेरआंखणी व गठण कर्जे -- (सर्व पिकांना) | | | | |
| | अ] रु.२५०००/- पर्यंत | १०.००% | १३.००% | १०.००% | १३.००% |
| | ब] रु.२५०००/- चेवर व रु.२.०० लाखापर्यंत | १०.००% | १४.००% | १०.००% | १४.००% |
| | क] रु.२.०० लाखाचे वर | १०.००% | १५.००% | १०.००% | १५.००% |
| ३ | मध्यम मुदती कर्जे -- | | | | |
| | अ) लघुसिंचन -- डगवेल, पंपसेट, ऑ. इंजिन, पाईप लाईन नविन विहिर, विहिर दुरुस्ती स्प्रिंकलर, ड्रीप, बोअरवेल, ट्युबवेल, इत्यादि. | | | | |
| | अ) रु.२५०००/- पर्यंत | ९.००% | १२.५०% | ९.००% | १२.५०% |
| | ब) रु.२५०००/- चेवर व रु.२.०० लाखापर्यंत | १०.५०% | १३.००% | १०.५०% | १३.००% |
| | क) रु.२.०० लाखाचे वर | १०.५०% | १२.००% | १०.००% | १२.००% |
| | ब) इतर शेती कर्जे (कारणांकारिता) -- (दुभती जनावरे, मळणीयंत्र, शेळीमेंढी, बैलजोडी, शेतघर, शेतकुंपण, शेतीऔजारे इत्यादि (लघुसिंचन सोडून इतर सर्व शेती कर्जे) | | | | |
| | अ) रु.२५०००/- पर्यंत | ९.००% | १२.५०% | ९.००% | १२.५०% |
| | ब) रु.२५०००/- चे वरव रु.२.०० लाखापर्यंत | ११.००% | १३.५०% | ११.००% | १३.००% |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| | क) रु.२.०० लाखाचे वर. | १३.००% | १५.००% | १२.००% | १४.००% |
| ४. | मध्यम मुदती कर्जे | | | | |
| | एकात्मिक ग्रामिण विकास योजना (आय.आर.डी.पी./गोबर गॅस) | ६.००% | १२.५०% | ६.००% | १२.५०% |
| ५. | कृषि यांत्रिकी सुविधा | | | | |
| | ट्रॅक्टर/पॉवर टिलर | १३.००% | १५.००% | १२.००% | १३.००% |
| ६. | प्रकल्पा अंतर्गत कर्जपुरवठा — (नाबार्ड मंजूर योजना) | | | | |
| | पडीत जमीन विकास, उपसा जलसिंचन, कुक्कुटपालन, शेळीमेंढी संगोपन, डेअरी प्रकल्प, फळोद्यान, फुलशेती. | | | | |
| | अ) रु.२५०००/-पर्यंत | ११.५०% | १२.५०% | ११.५०% | १२.५०% |
| | ब) रु.२५०००/-चे वर रु.२.०० लाखापर्यंत | ११.५०% | १४.००% | ११.५०% | १४.००% |
| | क) रु.२.०० लाखाचे वर | ११.५०% | १५.५०% | ११.५०% | १५.५०% |
| ७. | मध्यम मुदती भाग खरेदी करण्यासाठी कर्जे | १४.००% | १७.००% | १४.००% | १७.००% |
| ८. | जमीन खरेदीकरिता कर्जयोजना (शेतकी सह. संस्था मार्फत) | १३.००% | १५.००% | १३.००% | १५.००% |
| ९. | बिगर शेती संस्थांना आकारावयाचे व्याज दर — | | | | |
| | १(अ) ग्राहक औद्योगिक व स्वतंत्र रित्या नमुद न केलेल्या इतर सर्व बिगर शेतकी संस्था — (अ) क्लिन कॅशक्रेडिट | १८.००% | — | १८.००% | — |
| | (ब) नजरगहाण " | १७.००% | — | १७.००% | — |
| | (क) ताबेगहाण " | १६.५०% | — | १६.५०% | — |
| | (ड) भांडवली कर्ज (म.मु./दि.मु.) | १६.००% | — | १६.००% | — |
| | (इ) फेरताबेगहाण ब्रिज लोन (ता.मु.कर्ज) | १७.००% | — | १७.००% | — |
| | (ब) प्रक्रिया व मार्केटींग १) रु.२.०० कोटीचे आतील मंजूर मर्यादा — (अ) क्लिन कॅशक्रेडिट | १७.००% | — | १७.००% | — |
| | (ब) नजरगहाण " | १६.५०% | — | १६.५०% | — |
| | (क) ताबेगहाण " | १६.००% | — | १६.००% | — |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| | (ड) मांडवली कर्ज (म.मु / दिर्घकर्ज) | १५.००% | — | १५.००% | — |
| | (इ) फेरताबेगहाण ब्रिजलोन (तात्पु. कर्ज) | १६.००% | — | १६.००% | — |
| २) रु.२.०० कोटीचे वरिल मंजूर मर्यादा | अ) क्लिन कॅश क्रेडीट | १६.५०% | — | १६.००% | — |
| | ब) नजरगहाण कॅशक्रेडीट | १६.००% | — | १५.५०% | — |
| | क) ताबेगहाण कॅशक्रेडीट | १५.५०% | — | १५.००% | — |
| | ड) मांडवली कर्ज (म.मु. / दिर्घमुदत) | १५.००% | — | १५.००% | — |
| | इ) फेरताबेगहाण ब्रिज लोन (तात्पु कर्ज) | १६.००% | — | १६.००% | — |
| २) पगारदार सेवकांच्या सहकारी पत संस्था | अ) क्लिन कॅश क्रेडीट | १७.००% | — | १६.५०% | — |
| | ब) मध्यम मुदती | १६.५०% | — | १६.००% | — |
| ३) ब्रिज लोन (अंतरिम सर्वप्रकारचे) | | १८.००% | — | १७.००% | — |
| ४) विणकर सह. संस्था | अ) हातमाग कॅश क्रेडीट | १०.५०% | — | ११.००% | — |
| | ब) यंत्रमाग कॅश क्रेडीट | १२.००% | — | १२.००% | — |
| ५) नागरी सह. बँका | कॅश क्रेडीट | १४.००% | — | १४.००% | — |
| ६) अर्बन कोऑप. संस्था | कॅश क्रेडीट | १६.००% | — | १६.००% | — |
| ७) ग्रामीण कारागिर बलुतेदार संस्था | कम्पोझिट व कॅशक्रेडीट कर्जे — | | | | |
| | अ) रु.२५०००/- पर्यंत | ९.००% | १२.५०% | ९.००% | १२.५०% |
| | ब) रु.२५०००/-चे वर | ११.५०% | १४.००% | १३.५०% | १४.००% |
| १०. वैयक्तीक कर्जावरील व्याजदर — | | | | | |
| १) सुवर्णतारण कर्ज | अ) सर्वसाधारण | १६.००% | — | १६.००% | — |
| | ब) शेतकऱ्यांसाठी (७/१२ चा उतारा घेऊन) | १४.००% | — | १४.००% | — |
| २) वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट – (वैय. बचत खात्यावरील) | | १८.००% | — | १८.००% | — |
| ३) वैयक्तिक ग्राहकोपयोगी कर्ज | | १८.००% | — | १८.००% | — |
| ४) वाहन खरेदी – (वैय. लाभार्थींना खाजगी उपयोगाकरिता) | | १६.५०% | — | १६.००% | — |

| १ | २ | ३ | ४ | ५. | ६ |
|---|---|---|---|---|---|
| | ५) रोड ट्रान्सपोर्ट (सिडबी / नाबार्ड योजनेअंतर्गत) | १६.००% | — | १६.००% | — |
| | ६) राष्ट्रिय बचत प्रमाणपत्रे (एन० एस० सी०) | १७.००% | — | १७.००% | — |
| | ७) वैयक्तिक व्यवसायासाठी अ) क्लीन कॅशक्रेडीट | १७.५०% | — | १७.५०% | — |
| | ब) नजरगहाण -"- | १६.५०% | — | १६.५०% | — |

ठराव सर्वानुमते मंजूर.

ब] बँकेतील ठेवीवरिल व्याजदरांत सुधारणा करण्याचे विषयावर चर्चा होऊन ठेवीवरिल सध्याचे व्याजदरांत कोणताच बदल न करता सध्या जेवढा व्याजदर आहे तोच दर खालीलप्रमाणे कायम ठेवण्यांत यावे, असे ठरले.

| अ.न. | ठेवीच्या कालावधी | व्याज दर. |
|---|---|---|
| १. | ३० दिवस ते ४५ दिवस | ७.००% |
| २. | ४६ दिवस ते ९० दिवस | ७.००% |
| ३. | ९१ दिवस ते १८० दिवस | ८.००% |
| ४. | १८१ दिवस ते १ वर्षापेक्षा कमी | ९.५०% |
| ५. | १ वर्ष ते २ वर्षापेक्षा कमी | ११.००% |
| ६. | २ वर्ष ते ३ वर्षापेक्षा कमी | १२.५०% |
| ७. | ३ वर्ष ते ४ वर्षापेक्षा कमी | १२.५०% |
| ८. | ४ वर्ष ते ५ वर्षापेक्षा कमी | १३.००% |
| ९. | ५ वर्ष आणि त्यावरिल | १३.००% |

ठराव सर्वानुमते मंजूर

क] मुदती ठेवीचे तारणावर ओव्हरड्राफ्ट विषयावर चर्चा करतांना मुदती ठेवीचे तारणावर कर्ज देतांना मुदती ठेवीच्या व्याजदरापेक्षा २% जास्त व्याज दराने कर्ज देण्यांत येत असून विशेषत: शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांना त्यांचे मुदती ठेवीचे तारणावर द्यावयाचे ओव्हरड्राफ्ट बाबत असलेल्या अटी व नियम यांत बदल करुन खालीलप्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे.

(१) मुद्दत ठेव कमीत कमी १ वर्ष मुदतीची असावी.
(२) मुद्दती ठेवीच्या तारणावर ८०% पर्यंत ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजूर करता येईल. या मर्यादेचा काळ एक वर्षाचा राहील.
(३) मुद्दती ठेवीवरील व्याजदरापेक्षा २% जादा व्याजदराने ओव्हरड्राफ्ट कर्जावर व्याज आकारणी राहील.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ११ :- पंकज पेपर बाईडींग अँड प्रिंटींग औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था र.नं. ३४४, कामठी (अवसायनातील) या संस्थेची शेअर्सची रक्कम परत करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, पंकज पेपर बाइडींग अँड प्रिंटींग औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था, र.नं. ३४४, कामठी ही संस्था अवसायनांत असून ह्या संस्थेचे अवसायकांनी बँकेचे खरेदी केलेले शेअर्सची रक्कम रु.१००/- परत मिळावे म्हणून दिनांक २।१२।८९ ला बँकेकडे हिस्से प्रमाणपत्र जोडून अर्ज सादर केला आहे. बँकेतील चालू ठेव खाते बंद केले असल्याने शेअर्सची रक्कम संस्थेला नगदीने परत करावी अशीही विनंती केली आहे. संस्थेकडे बँकेचे कोणतेही प्रकारचे कर्ज नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थेकडे बँकेचे कोणतेही कर्ज नसल्याने व संस्थेचे अवसायकांनी मागणी केल्याप्रमाणे शेअर्सची रक्कम रु.१००/- नगदीने परत करून सभासदत्व रद्द करण्यांत यावे, व तसा निर्णय सहकार खात्याला कळविण्यांत यावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १२ :- मे. वाधवानी कोल्ड स्टोअरेज अँड आईस प्लँट प्रा.लि., नागपूर यांचे खेळते भांडवलांकरिता कॅश क्रेडीट मर्यादा रु.३२४.०० लाख मंजूरीसाठी सादर केलेल्या प्रकल्प अहवालास मंजूरीबाबत व सदर प्रकल्प अहवाल पुढील मान्यतेस राज्य सहकारी बँकेमार्फत नाबार्डकडे पाठविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १२ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती दिली. मे. वाधवानी कोल्ड स्टोअरेज अँड आईस प्लँट प्रा.लि. नागपूर यांचेकडे मिरची, कांदे, बटाटे इत्यादि शेतकरी/व्यापारी यांच्या शेतमाल साठवणुकीकरिता कळमना मार्केट यार्ड परिसरांत कोल्ड स्टोअरेज

कार्यरत आहे. सद्यस्थितीत बँकेचे प्रचलित कर्ज धोरणानुसार मे. वाधवानी कोल्ड स्टोरेज मध्ये शेतकरी/व्यापारी यांनी साठवणूक केलेल्या मालाचे बिल्टीचे तारणावर त्या दिवशीच्या बाजारभावाप्रमाणे मालाचे किंमतीचे ५५% रकमेपर्यंत ६ महिने मुदतीसाठी एका खातेदारास जास्तीत जास्त रुपये १०.०० लाखापर्यंत रकमेच्या कर्जपुरवठा करण्यांत येत आहे. परंतु साठवणूक केलेला माल मोठ्या प्रमाणावर असल्यास शेतकरी/व्यापारी इतर राष्ट्रीयकृत सरकारी बँकेकडून कर्ज सुविधा घेत आहेत. त्यामुळे कोल्ड स्टोरेजमध्ये साठवणूक केलेल्या मालावर एकाच बँकेकडून कर्ज सुविधा उपलब्ध झाल्यास साठवणूक केलेल्या मालावर एकाच बँकेकडून कर्ज सुविधा उपलब्ध झाल्यास साठवणूक-केलेल्या मालावर नियंत्रण ठेवणे सोयीचे होईल. या दृष्टीने मे. वाधवानी कोल्ड स्टोरेज यांनी रु. ३२८.०० लाखाच्या खेळते भांडवली खर्चासाठी कर्जासाठी प्रकल्प अहवाल तयार करुन मंजूरीसाठी बँकेकडे सादर केलेला आहे. त्यानुसार बँक खेळते भांडवली कर्ज मर्यादेवर जो व्याज दर बँक आकारील तेच व्याज दर सभासदास आकारणी करुन साठवणूक केलेल्या मालाचे किंमतीचे ६०% रक्कम बिल्टीचे तारणावर कोल्ड स्टोरेज कडून अदा करण्यांत येईल. व कर्ज रकमेच्या ५०% रक्कम कोल्ड स्टोरेजला बँक मंजूर करेल व उर्वरित १०% रक्कम कोल्ड स्टोरेज स्वनिधीतून देणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर माल ठेवणारे शेतकरी/व्यापारी यांना कर्जपुरवठा करता येईल.

सदर प्रकल्प अहवाल बँकेचे पॅनेलवरील चार्टर्ड अकाउंटंट श्री. पी. एस. ठाकरे यांचेकडून छाननी करुन घेण्यांत आला असून त्यांनी दिलेल्या अभिप्राया-नुसार प्रकल्प आर्थिक दृष्ट्या सक्षम असून यामध्ये कर्जनिधी उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही.

तरी कोल्ड स्टोरेज मध्ये शेतकरी/व्यापारी यांनी साठवणूक केलेल्या मालाचे तारणावर कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी मे. वाधवानी कोल्ड स्टोरेज यांचे खेळते भांडवली कर्जमर्यादा मंजूरीकरिता आलेला प्रकल्प अहवालानुसार कर्जनिधी उपलब्ध करुन देणेकरिता सभेपुढे निर्णयासाठी टिपण ठेवले आहे.

यावर सभेत चर्चा होऊन चर्चेअंती ठरले की, मे. वाधवानी कोल्ड स्टोरेज अँड आईस फॅक्टरी प्रा. लि. कळमना मार्केट यार्ड, नागपूर यांना त्यांचे कोल्ड स्टोरेजमध्ये शेतकरी/व्यापारी यांना साठवून ठेवलेल्या मालाचे तारणावर कर्ज उपलब्ध करुन देणेसाठी सादर केलेल्या रु. ३२८.०० लाखाचे प्रकल्प अहवालास मंजूरी देऊन रुपये २५०.०० लाख खेळते भांडवली कर्जमर्यादा बँकेमार्फत उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर प्रकल्प अहवाल नाबार्डचे मान्यतेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमी.

मुंबई यांच्यामार्फत पाठविण्यात यावा असे ठरले. तसेच नाबार्डने कळविलेल्या अटीव शर्ती बँकेस मान्य राहील तसेच कर्ज मंजूरीच्या खालील धोरणास मंजूरी देण्यात आली.

कर्ज धोरण :

१. बँकेने मंजूर केलेल्या कर्ज रकमेचा उपयोग मे. वाधवानी कोल्ड स्टोअरेज मध्ये शेतकरी/व्यापारी यांनी साठवणूक केलेल्या शेतमालाचे तारणावर कर्ज घेण्यासाठीच करता येईल.

२. कोल्ड स्टोअरेजमध्ये साठवणूक केलेल्या मालाची मोटार रिसिट (एम.आर.)/ रेल्वे रिसिट (आर.आर.) किंवा खरेदी मालाची अधिकृत रशिद असे तत्सम कागदपत्रे माल साठवणूक करणाऱ्याने कंपनीला पृष्ठांकन करून द्यावी व कंपनीने त्या तत्सम कागदपत्रावर बँकेचे नावाने पृष्ठांकन करून द्यावी लागेल. या कागदपत्रावर रुपये १०/- चा कोर्ट फी स्टँप लावावा लागेल.

३. पृष्ठांकन केलेली एमआर./आर.आर./खरेदी रशिदचे नुसार मालाची गुणवत्ता व वजन याची शहानिशा कंपनीने करून तयार केलेली बिल्टी बँकेला लिन करून द्यावी लागेल.

४. कंपनीने लिन नोंद केलेली बिल्टी, पृष्ठांकन केलेली एम.आर./आर.आर/ खरेदी रशिद इ. व बाजारभाव प्रमाणित करणेसाठी कृषि उत्पन्न बाजार समितीचे प्रमाणपत्र कर्ज मागणी अर्जासह बँकेचे शाखेकडे सादर करावे लागेल.

५. सदर माल मे. वाधवानी कोल्ड स्टोअरेज प्रा.लि. नागपूर यांचे स्टोअरेजमध्ये असल्याने व माल त्यांचे ताब्यांत असल्याने कर्ज मागणी अर्जासोबत संबंधित मालाचा धारक म्हणून कंपनीला बँकेचे विहित नमुन्यात (गॅरंटी) ट्रस्ट रिसिट बँकेला करून द्यावी लागेल.

६. कोल्ड स्टोअरेजमध्ये साठवणूक केलेल्या मालावर इतर कुठल्याही बँकेचा बोझा नाही किंवा सदर माल कोणत्याही बँकेला तारणांत दिला नाही याबाबतचे रु.१००/- चे स्टँपपेपरवर प्रतिज्ञा पत्र माल ठेवणाऱ्याला व कंपनीला बँकेचे नावाने करून द्यावे लागेल.

७. या योजनेअंतर्गत कंपनीला सहयोगी कंपनीने खरेदी केलेला माल साठवणूक करता येईल परंतु सदर मालावर कोणत्याही बँकेकडून कर्ज घेतले नसल्याबाबत रु.२०/- चे स्टँपपेपरवर साठवणूक करणाऱ्या कंपनीला प्रतिज्ञा पत्र करून द्यावे लागेल.

८. या योजनेअंतर्गत केलेल्या कर्जपुरवठ्याची मुदत ६ महिने पर्यंत राहील. मुदतीत माल न सोडविल्यास कंपनीचे कुठल्याही खात्यातून रकम वसुली करण्याचा अधिकार बँकेला राहील. तसेच व्याजदर प्रकल्प अहवालांत दर्शविल्यानुसार

प्रोजेक्ट फायनान्सिंगवर दरसाल दरशेकडा १६ टक्के राहिल.

९. साठवणूक केलेल्या मालाच्या पुरेशा रकमेचे, कर्ज मुदतीचे कालावधीचा विमा कंपनी व बँक यांचे संयुक्त नांवाने काढून पॉलिसी बँकेला सादर करावी लागेल.

१०. साठवणूक केलेल्या मालाची किंमत एमआर./आर.आर./खरेदी रशिद यावरील किंमत व कृषि उत्पन्न बाजार समिती यांचे प्रमाणपत्रावरील किंमत यामध्ये जी किंमत कमी असेल ती किंमत ग्राह्य धरून साठवणूक केलेल्या मालाचे ६०टक्के इतपत कंपनी कर्ज रक्कम अदा करू शकेल व या कर्ज रकमेच्या ५०% रक्कम बँक कर्जरक्कम निश्चित करेल.

११. साठवणूक केलेल्या मालाची तपासणी करण्याचा अधिकार नाबार्ड, राज्य सहकारी बँक, जिल्हा बँकेचे अधिकारी यांना राहिल.

१२. वरिल अटीव्यतिरिक्त अधिकच्या अटी घालण्याचा किंवा अटीत बदल करणेचा अधिकार बँकेला राहिल.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १३:— कर्मचारी/नागरी सहकारी पत संस्थांचे पगारदार सभासदांना वैयक्तिक घरबांधणी कर्ज मंजूरीसाठी कर्जधोरण ठरविणे बाबत विचार करणे

ठराव क्रमांक १३ :— मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेला संलग्न असलेल्या पगारदार व नागरी सहकारी पत संस्थांचे अडीअडचणीवर चर्चा करण्यासाठी बोलाविण्यांत आलेल्या दिनांक ७.२.२०००चे सभेत पगारदार व नागरी सहकारी पत संस्थांचे पगारदार सभासदांना बँकेने वैयक्तिक घरबांधणीसाठी कर्ज पुरवठा करावा अशी मागणी आली असून, नाबार्ड, पूणे यांचे पत्र क्र.रा.बैं.स.विंवि. (सह) १८७/सी-१/९७-९८ दिनांक ५.६.९७ आणि मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे पत्र क्र. अर्थ-२/डी/जीमस बँक/गृह-वि. कर्ज/९८ दिनांक ४-१-१९९८ चे पत्रानुसार जिल्हा सहकारी बँकेमार्फत घरबांधणीसाठी वैयक्तिक कर्जपुरवठा करणेस मंजूरीप्राप्त झालेली आहे.

त्या अनुषंगाने कर्मचारी/नागरी सहकारी पत संस्थांचे पगारदार सभासदांना घरबांधणीसाठी कर्ज उपलब्ध करून देणेकरिता खालीलप्रमाणे तयार करण्यांत आलेल्या वैयक्तिक कर्जपुरवठ्याचे धोरणास मान्यता देण्यांत आली असून, सदर कर्ज धोरणांत व अटीत आवश्यकतेनुसार फेरबदल करण्याचा अथवा अधिकच्या अटी टाकण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.

घरबांधणीसाठी वैयक्तिक कर्जपुरवठ्याचे धोरण :—

अ] सहकारी संस्थांची पात्रता :-

१) कर्मचारी/नागरी सहकारी पत संस्था बँकेची सभासद असेल व बँकेशी कर्ज/ठेव व्यवहार करित असेल अशाच संस्थेच्या फक्त पगारदार सभासदास नविन घर बांधणीसाठी कर्ज पुरवठा करण्यांत येईल.

२) नागरी सहकारी संस्थांचे बाबत संस्थांनी त्यांच्या ठेवीपैकी किमान २५% ठेवी बँकेत गुंतवाव्या लागतील.

3) ज्या पगारदार/नागरी सहकारी पतसंस्थेकडे बँकेचे कर्ज थकित नसेल अशाच संस्थांचे पगारदार सभासदांना कर्ज पुरवठा करण्यांत येईल.

४) पगारदार/नागरी सहकारी संस्थांचे अद्यावत ऑडीट झालेले असावे व ऑडीट वर्ग "ड" नसावा. तसेच ऑडीट नोटमध्ये अफरातफर वगैरे सारखे गंभीर स्वरूपाचे दोष नसावे.

५). सभासदांचे पगारामधून संस्थेची वसुली कपात करुन, संस्थेकडे जमा करणेबाबत सहकारी संस्था कायदा १९६०-चे कलम ४९(२)नुसार एम्प्लायरने हमी घेतलेली असावी. सदर हमी पत्र दप्तरी उपलब्ध ठेवून त्याची प्रत — प्रकरणासोबत सादर करावी लागेल.

६. संस्थेची सभासदाकडील कर्जवसुली नियमीत असावी तसेच एकूण सभासद कर्जाचे १०%पेक्षा अधिक थकित बाकी नसावी.

७. संस्थेचे कर्ज खाते बँकेच्या ज्या शाखेत आहे, त्या शाखेमार्फतच अर्ज करावा लागेल.

८. सभासदाला घरबांधणी कर्ज बँकेने मंजूर केल्यास सभासदाची कर्जवसुलीची हमी संस्थेनी स्विकारली पाहिजे व एम्प्लायरकडून आलेली वसुली त्वरित बँकेत जमा केली पाहिजे, याकरिता बँकेने पाडून दिलेल्या कर्ज हप्त्यानुसार एम्प्लायरकडे कर्ज हप्त्याची मागणी करणे व आलेली वसुली त्वरित बँकेत जमा करण्याची जबाबदारी संस्थेची राहिल. यासाठी संस्थेला रुपये ५०/-चे स्टँप पेपरवर संमतीपत्र द्यावे लागेल.

९. कर्जवसुली बाबत संस्था, सभासद, एम्प्लॉयर व बँक असा संयुक्तिक करारनामा रुपये १००/-चे स्टँपपेपरवर करुन द्यावा लागेल.

ब] कर्ज मागणी करणाऱ्या सभासदांची पात्रता :-

१. संस्थेचे सभासदत्व स्विकारुन किमान २ वर्षे पूर्ण झाली असावी व सभासदाने संस्थेचे किमान रु.१०,०००/-चे हिस्से खरेदी केले असावेत.

२. सभासदाकडे संस्थेचे कर्ज थकित नसावे. तसेच यापूर्वी देखील कर्ज थकित ठेवण्याची सवय नसावी. म्हणजेच कर्जवसुली दरमहा नियमित येत असावी

३. सभासदांची नोकरी कायम स्वरुपाची असावी व नोकरीत एकूण ५ वर्षे सेवा पूर्ण झाली असावी. तसेच नोकरीतील सभासदांचा शिल्लक सेवाकाळ किमान ७ वर्षे असावा.

४. सभासदाला सर्व प्रकारच्या कपाती वजा जाऊन व घरबांधणी कर्ज मंजूर झाल्यास त्याचा व्याजासह कर्जहप्ता वसुलीनंतर किमान २५% पगार हाती मिळावयास पाहिजे यासाठी मागिल सहा महिन्याच्या पगाराचा दाखला जोडावा लागेल.

५. अर्जदार सभासद ज्या कार्यालयात काम करतो त्याच कार्यालयातील काम करणारे व संस्थेचे सभासद असलेले २ जमानतदार द्यावे लागेल. जमानतदाराला कर्ज वसुलीची हमी स्विकारावी लागेल.

६. अर्जदार व जमानतदार यांना बँकेचे नाममात्र सभासद व्हावे लागेल.

क] कर्ज मंजूरीचे धोरण व कार्यपध्दती :-

१. अर्जदार जिल्ह्यातील रहिवाशी असावा, व नागपूर जिल्ह्याअंतर्गत शहरी/ग्रामिण भागात घरबांधणीसाठी/गाळा खरेदीसाठी/बांधलेले घर विकत घेण्यासाठी कर्ज पुरवठा करण्यांत येईल.

२. नविन बांधकाम करावयाचे असल्यास स्वमालकीचा प्लॉट असावा. जागा स्वमालकीची असल्याचे दर्शविणारे दस्ताऐवज सादर करावे लागेल.

३. अर्जदाराला ज्या जागेवर बांधकाम करावयाचे आहे ती जागा/प्लॉट ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या उदा० ग्राम पंचायत/नगरपरिषद/महानगरपालिका/सुधार प्रन्यास यांचे कार्यक्षेत्रांत येत असेल, त्यांनी बांधकामासाठी मंजूरी दिलेली असावी तसेच बांधकामाच्या नकाशा मंजूर केलेला असावा.

४. ज्या जागेवर/प्लॉटवर बांधकाम करावयाचे आहे ती जागा/प्लॉट महसुल विभागाने गैरकृषि केलेली असावी.

५. जागेच्या/प्लॉटच्या सर्च रिपोर्ट बँकेचे पॅनेलवरील वकिलांकडून करुन घ्यावा लागेल. व वकिलाची फी अर्जदारास अदा करावी लागेल.

६. तसेच बँकेचे पॅनेलवरील आर्कीटेक्टकडून बांधकामाची एस्टीमेट प्रमाणित करुन घ्यावे लागेल. तसेच वेळोवेळी झालेल्या बांधकामाचे मुल्यमापन पॅनेलवरील आर्कीटेक्टकडून करुन घेऊनच पुढील बांधकामासाठी कर्जहप्ता उचल करतां येईल. याबाबतची आर्कीटेक्टची फी अर्जदारांस वेळोवेळी अदा करावी लागेल.

७. या योजने अंतर्गत जास्तीत जास्त रुपये ५.०० लाखापर्यंत घर बांधणी कर्ज मर्यादा राहील.

ग. सभासदाची पात्रता :-

अ) पगाराबद्दल मागिल ६ महिन्याचे प्रमाणपत्र कार्यालयाचे सही शिक्यानिशी सादर करावे लागेल.

ब) मागील ६ महिन्यांत मिळालेला शुद्ध पगार व महागाई भत्ता यांचे सरासरीचे ४५पट येणारी रक्कम किंवा घरबांधणी खर्चाचे एस्टीमेटच्या, खरेदी करावयाचे घराचे / फ्लॅटचे किंमतीच्या ७५% रक्कम किंवा रुपये ५,००,००० लाख यामध्ये कमी असणारी रक्कम कर्ज मंजूरीस पात्र राहील.

क) अर्जदाराची सलग सेवा ५ वर्षे पूर्ण झाली असावी व सेवा कायम स्वरुपाची असावी. तसेच सेवानिवृत्तीला ८ वर्षापेक्षा अधिक काळ शिल्लक असावा.

ड) सभासदांच्या स्वमालकीचा प्लॉट बोझा विरहीत किंवा कुठल्याही कर्जाच्या गहाणांत नसावा.

९. अर्जदाराकडे इतर सहकारी बँकांचे तसेच व्यापारी बँकांचे कर्ज नसावे. तसेच संबंधीत सहकारी संस्थे व्यतिरिक्त इतर सहकारी संस्थेचे कर्ज नसावे.

१०. कर्ज मागणी अर्जसोबत खालील कागदपत्रे जोडावी लागेल.

१) जागा खरेदीचे कागदपत्रे, रजिस्ट्रीची मुळप्रत, वाटणी पत्र इ.

२) मालकी हक्क दर्शविणारे दस्तऐवज ७/१२, सर्च रिपोर्ट इ०

३) मंजूर नकाशा ग्रामपंचायत / नगरपरिषद / महानगरपालिका / सुधार प्रन्यास इत्यादि कडून व बांधकामास मंजूरी पत्र.

४) सहकारी संस्थेचा ले-आऊट असल्यास, संस्थेने "ना हरकत प्रमाण पत्र", ले-आऊट नकाशा, संस्थेचे मालकीबाबत दस्तऐवज.

५) गैरकृषि जागा असल्याच्या पुराव्यासाठी कागदपत्रे.

६) बांधकाम एस्टीमेट आर्कीटेक्टचे सही शिक्यानिशी.

७) ६ महिन्याचे पगाराचा दाखला एम्प्लायरचे सही शिक्यानिशी.

८) नोकरीत कायम असल्याचा दाखला, त्यांत नोकरीत पूर्ण केलेला कार्यकाळ व शिल्लक सेवा काळाचा उल्लेख असावा.

९). सहकारी संस्थेचा कर्ज नसल्याचा दाखला / ना हरकत दाखला.

११. कर्ज मागणी अर्ज बँकेचे कार्यालयांत रुपये १००/- जमा करुन मिळेल.

१२. <u>कर्ज वाटप व गहाण खत</u> :-

अ) कर्ज वाटपापूर्वी बँकेचे पॅनेलवरील वकिलांकडून गहाण खत करुन द्यावे लागेल.

ब) स्वगुंतवणूक म्हणून प्रथम प्लींथ पर्यंतचे बांधकाम अर्जदारास स्वतः करावे लागेल, त्यानंतर ४ हप्त्यांत कर्ज वाटप केले जाईल.

क) प्लींथपर्यंतचे बांधकामाचे आर्कीटेक्टचे प्रमाणपत्रानुसार पुढील बांधकामासाठी मंजूर कर्जाचे ३०% रक्कम अथवा खर्चाचे ८०% रक्कम यामधील कमी रक्कम प्रथम कर्जहप्ता देण्यांत येईल. प्रथम कर्जहप्ता

घेतल्याचे तारखेपासून १२ महिन्याचे आंत बांधकाम पूर्ण करावे लागेल.

दुसरा कर्जहप्ता लिंटल लेवल पर्यंत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आर्किटेक्टचे प्रमाणपत्रानुसार खर्चाचे ६० टक्के रक्कम अथवा मंजूर कर्जाचे ३०% रक्कम यामधील कमी असलेली रक्कम.

तिसरा कर्जहप्ता स्लॅब पूर्ण झाल्यानंतर आर्किटेक्टचे प्रमाणपत्रानुसार खर्चाचे ६०% रक्कम अथवा मंजूर कर्जाचे ३०% रक्कम यामध्ये कमी असणारी रक्कम.

चवथा व शेवटचा हप्ता बांधकाम पूर्ण झाल्याचे आर्किटेक्टचे कम्प्लिशन सर्टिफिकेट घेऊन खर्चाचे ६०% रक्कम अथवा मंजूर कर्जाची उर्वरित रक्कम यामध्ये कमी असणारी रक्कम.

१३. नैसर्गिक आपत्ती व आग ह्यापासून होवू शकणाऱ्या हानीसाठी सुरक्षिततेचे दृष्टीने विमा काढणे जरुरी राहील.

१४. बांधकाम पूर्ण होऊन राहण्या योग्य घर खरेदीसाठी खालीलप्रमाणे जादा कागदपत्रे द्यावी लागेल.

१) घराचे बांधकाम १० वर्षांचे आंतील असावे.

२) बांधकाम मंजूरीचे कागदपत्रे, नकाशा, मालकी हक्क दस्तऐवज इत्यादि.

३) पॅनेलवरील आर्किटेक्टचे मुल्यांकन प्रमाणपत्र.

४) पॅनेलवरील वकिलांकडून सर्च रिपोर्ट.

५) रजिस्टर्ड ईसार चिठ्ठी / करारनामा.

६) मुल्यांकनाचे ७५% रक्कम किंवा रुपये ५.०० लाख यातील कमी रक्कम कर्जास पात्र राहील.

७) ज्यांचेकडून खरेदी करावयाचे आहे, त्यांचे नांवे चेक/डिमांड ड्राफ्ट द्वारे पेमेंट करण्यात येईल.

१५. सहकारी गृहनिर्माण संस्थेचा गाळा किंवा बिल्डरकडून गाळा खरेदी करीत असल्यास खालील जादा कागदपत्रे जोडावी लागतील.

अ) गाळ्याचे बांधकाम करणाऱ्या संस्थेला/बिल्डरला जागेचे मालकी हक्क दर्शविणारे दस्तऐवज.

ब) गाळा अर्जदारास बांधून / विक्री करुन देण्यासाठी संस्था / बिल्डर व खरेदीदार यांचेमधील रजिस्टर्ड करारनामा असावा.

क) सर्च रिपोर्ट (बँकेचे पॅनेलवरील वकिलांकडून प्रमाणित केलेला)

ड) एस्टीमेट (बँकेचे पॅनेलवरील आर्किटेक्टकडून प्रमाणित केलेले)

इ) रकमा जमा केल्याच्या पावत्या.

फ) सहकारी संस्था असल्यास सभासदत्वाचे कागदपत्रे तसेच संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

ग) गाळा/फ्लॅटवर कर्जाचा बोझा निर्माण करण्यासाठी गृहनिर्माण सहकारी संस्थेचे "ना हरकत प्रमाणपत्र".

घ) यामध्ये नगदीने रकम मिळणार नाही, सोसायटी/बिल्डर यांना डि.डि. द्वारे पेमेंट करण्यांत येईल.

च) गाळ्याचे बांधकाम उवर्षाचे आंत पूर्ण होवुन कर्जवसुली सुरु होणे आवश्यक राहिल. या कालावधीत कर्जावरील व्याज जमा करावे लागेल.

ड) कर्जाची परतफेड :-

सदर कर्जाची परतफेड घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर किंवा शेवटच्या कर्जहप्ता उचल घेतल्यानंतर पुढील महिन्यापासून अथवा - कर्जाचा प्रथम हप्ता घेतल्यापासून १२ महिन्यानंतर कर्जवसुलीस पात्र राहिल. घराचे बांधकाम कर्जाचा प्रथम हप्ता उचल केल्यापासून १२ महिन्यांत पूर्ण होणे आवश्यक राहिल.

कर्जाची परतफेड मासिक १४४ हप्त्यांत म्हणजेच १२ वर्षात व्याजासह करावी लागेल. कर्ज उचल दिल्यापासून परतफेड सुरु होईपर्यंतचे काळा-तील कर्जावरील व्याज दरमहा बँकेत जमा करावी लागेल.

ई] व्याज दर :-

द.सा.द.शे. १६% दराने व्याज आकारणी केली जाईल. कर्जहप्ता थकित झाल्यास थकित रकमेवर १% जादा दराने व्याजाची आकारणी केली जाईल. व्याजदरामध्ये बदल करण्याचा अधिकार बँकेला राहिल.

फ) वरील अटींव्यतिरिक्त अधिकच्या अटी घालण्याचा किंवा अटीत बदल करणेचा अधिकार बँकेला राहील.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १४ :- बँकेचे सरव्यवस्थापक श्री.एन.एन.चौधरी यांचा परसेवेवरील कालावधी संपल्यामुळे राज्य सहकारी बँकेकडून प्राप्त झालेल्या पत्रावर विचार करणे.

ठराव क्रमांक १४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमी; मुंबईचे अधिकारी श्री. एन.एन.चौधरी हे आपल्या बँकेत दिनांक २.७०.९३ पासून सरव्यवस्थापक म्हणून परसेवेवर काम करीत आहेत. त्यांचा परसेवेचा कालावधी दिनांक २५.१.२००० रोजी संपला आहे.

श्री. एन.एन.चौधरी यांचे परसेवेचा कालावधी दि.२५.१.२००० रोजी संपत असल्यामुळे सदर तारखेस त्यांना मुक्त करण्याची व्यवस्था

व्हावी अशी विनंती दिनांक ३१.७.२०००चे पत्रानुसार महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई यांनी केली आहे.

श्री. ए. एन. चौधरी यांनी मागील ७/८ वर्षापासून सरव्यवस्थापक पदाचा पदभार यशस्वीरित्या सांभाळलेला आहे. या काळात त्यांनी बँकेची प्रगती साधण्यात मोलाचे सहकार्य केलेले आहे. बँकेची आजची परिस्थिती विचारात घेता त्यांचे सेवेची बँकेला आवश्यकता आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री. ए. एन. चौधरी यांच्या परसेवेचा कालावधी आणखी एक वर्षाने म्हणजे दिनांक २५.७.२००१ पर्यंत वाढविण्यात यावा अशी विनंती महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई यांना करण्यात यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १५ :- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक १५(१) :- श्री. ए. जी. गोरवले, मुख्य हिशेबनिस, लेखा विभाग, मुख्य कार्यालय नागपूर यांच्या सेवानिवृत्ती पूर्व शिल्लक हक्काचे रजेचा पगार देण्यासंबंधी विचार करणे.

ठराव क्रमांक १५(१) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री. ए. जी. गोरवले हे बँकेत मुख्य हिशेबनिस (मुख्याधिकारी) लेखा विभाग म्हणून कार्यरत आहेत. त्यांना वयाची ५८ वर्षे दिनांक ८.६.२००० ला पूर्ण होत असून, जन्मतारखेच्या आधारावर बँकेच्या प्रचलित धोरणानुसार दि. ३०.६.२००० रोजी सेवानिवृत्त करावे लागेल. त्यांनी एक महिन्याच्या रजा उपभोगण्यास परवानगीसाठी अर्ज केलेला आहे. त्यांचे रजा खात्यात हक्काच्या रजा एकूण १४२ दिवसांच्या शिल्लक आहेत. बँकेचे लेखा विभागातील आजची परिस्थिती विचारात घेता, त्यांचे सेवेची बँकेला आवश्यकता असल्याचे विचारात घेता त्यांना रजा उपभोगण्यास परवानगी न देता त्यांचेकडून सेवानिवृत्तीचे तारखेपर्यंत त्यांची तयारी असल्यास काम करवून घेतल्यास ते तेवढ्या दिवसांच्या रजेच्या पगाराची मागणी करु शकतील. बँकेचे स्थायी आदेशातील क्रमांक ९(एक) प्रमाणे सेवानिवृत्तीपूर्वी शिल्लक रजा उपभोगण्यासाठी अर्ज केल्यास परवानगी देण्यात यावी. किंवा त्या बदल्यांत पगार व भत्ते रजा नाकारल्या बद्दल पेमेंट करावे अशी तरतुद आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे मुख्य कार्यालयातील लेखा विभागात कामाची निकड लक्षात घेता श्री. ए. जी. गोरवले, मुख्य हिशेबनिस

(मुख्याधिकारी) यांनी सेवानिवृत्ती रजेवर न जाता सेवानिवृत्त होण्याचे तारखे-पर्यंत बँकेत काम करावे व सेवानिवृत्ती तारखेपर्यंत काम करून त्यांनी रजेच्या पगाराची मागणी केल्यास सेवानिवृत्तीचे वेळी त्यावेळचे पगार दरानुसार सेवानिवृत्ती तारखेपर्यंत जितके दिवस काम करतील तितक्या दिवसांच्या रजेचा (मुळ वेतन + महागाई) दिल्या जावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १५(२) :- प्राथमिक विणकर सहकारी संस्थांना आकारावयाच्या व्याज दरांत नाबार्डने सुचविलेल्या बदलाबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक १५(२) :- महाराष्ट्र राज्य को-ऑप. बँक लि; मुंबई यांचे पत्र क्र० एएफए/जीइि/एक १८८/१८२२/व्याजदर/९९-२००० दि. २.१२.९९चे पत्रानुसार नाबार्डने हातमाग/यंत्रमाग प्राथमिक विणकर सह० संस्थांच्या उत्पादन व विक्री व्यवहाराकरिता खेळते भांडवलासाठी कर्जपुरवठ्यावरील व्याजदरांत बदल कळविला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन, हातमाग विणकर सहकारी संस्था व यंत्रमाग विणकर सहकारी संस्थांचे बाबतीत व्याजदर खालील प्रमाणे ठरविण्यात आला आहे.

| | सध्याचा दर | सुधारित दर |
|---|---|---|
| १) हातमाग विणकर संस्था | १०.५०% | ११.००% |
| २) यंत्रमाग विणकर संस्था | १२.००% | १२.००% |

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १५(३) :- मा० संचालकांनी केलेल्या गुजरात व राजस्थान राज्यातील दौऱ्याबाबत माहिती देणे व त्यांचे प्रवास भत्ता बिलास मंजूरी देणे तसेच नेतृत्व विकास कार्यक्रमास गेलेल्या संचालकांचे प्रवासभत्ता बिलास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक १५(३) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राजस्थान व गुजरात राज्यातील जिल्हा सहकारी बँकांचा व इतर सहकारी संस्थांचा अभ्यास करण्यासाठी दौऱ्यावर जाण्याकरिता दिलेल्या परवानगीनुसार अभ्यास दौरा कार्यक्रम आयोजीत करून अभ्यास दौऱ्यावर जाण्यासाठी संमती कळविलेल्या संचालकांनी अभ्यास दौरा पूर्ण केलेला आहे. या १४ दिवसाचे अभ्यास दौऱ्यात त्यांनी आयोजीत क्र-

कार्यक्रमांत दर्शविण्यांत आलेल्या खालील संस्थांना व बँकांना भेटी दिल्या आहेत.

१) अन्योन्य सहाय्यकारी मंडळी को-ऑप. बँक लिमी., वडोदरा.

२) गुजरांत राज्य सह. बँक मर्या. अहमदाबाद

३) वडोदा सेन्ट्रल को-ऑप बँक लिमी. वडोदा.

४) अहमदाबाद जिल्हा सहकारी बँक मर्या. अहमदाबाद

५) कालपूरा कमर्शियल को-ऑप बँक लि. अहमदाबाद

६) गांधीनगर जील्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्या. गांधीनगर

७) उदयभानूसिंह क्षेत्रिय सहकारी प्रबंध संस्थान, गांधीनगर

८) उदयपूर सेन्ट्रल को-ऑप. बँक लि. उदयपूर.

९) अजमेर अर्बन को-ऑप बँक लिमी., अजमेर.

१०) जयपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., जयपूर.

११) राजस्थान राज्य सहकारी बँक मर्या., जयपूर.

अभ्यास दौरा पूर्ण करुन आल्यानंतर मा. संचालकांनी प्रवासभत्ता बील मंजूरी करिता बँकेस सादर केली आहेत.

कर्नाटक राज्यातील म्हैसूर येथे दिनांक २८जानेवारी २००० ते ३१ जानेवारी २००० या कालावधीत आयोजीत नेतृत्व विकास कार्यक्रमास बँकेच्या ३ महिला संचालिकांना पाठविण्यांत आले होते. सदर नेतृत्व विकास कार्यक्रमाचे आयोजन वैकुंठ मेहता राष्ट्रिय सहकारी प्रबंध संस्थान, पुणे यांनी केले होते. नेतृत्व विकास कार्यक्रम आटपून आल्यानंतर महिला संचालिकांनी प्रवास भत्ता बील मंजूरीकरिता बँकेस सादर केली आहेत.

विषयावर सविस्तर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या मा. संचालकांनी राजस्थान व गुजरांत राज्यांतील जिल्हा सहकारी बँकेच्या व इतर सहकारी संस्थांच्या दिलेल्या भेटीच्या वृतांताची तसेच महिला संचालिकांनी म्हैसूर येथील नेतृत्व विकास कार्यक्रमास उपस्थितीबद्दल सभेत नोंद घेण्यांत आली. व त्यांनी सादर केलेली प्रवास भत्ता बील एकूण रुपये १४४८८७/- असलेली खालीलप्रमाणे मंजूर करण्यांत आली.

१. मा. श्री. र. व्यं. भिमजे, अभ्यासदौरा, प्रवासभत्ता बील — रु. १३५५०=००
२ मा. श्री. अ. रा. गुप्ता — " — रु. १३६९९=००
३. मा. श्री. वि. रा. हुलके — " — रु. १३६२६=५०
४. मा. श्री. वसंतराव वांढे — " — रु. १३६३८=००
५. मा. श्री. सं. लि. चोरे — " — रु. १३६०९=५०
६. मा. श्री. ग. के. शाहिर — " — रु. १३५५०=००
७. मा. श्री. शा. ग. धवड — " — रु. १३८२०.००

८ मा. श्री. चं. तु. समर्थ, अभ्यास दौरा प्रवासभत्ता बील रु. १३६२२.००
९. मा. सौ. आशाताई महाजन, नेतृत्व विकास कार्यक्रम रु. १०९०२.००
१०. मा. सौ. कुसुमताई किंमतकर —"— रु. ११०५२.००
११. मा. सौ. स्मिताताई कुंभारे —"— रु. १०९०२.००

(एकूण) रुपये १४४६६६.००

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७५(४) :- सहस्त्रकालीन नविन वर्षानिमित्य "स्मृतीचिन्ह" म्हणून बँकेच्या पदाधिकारी, मा. संचालक, अधिकारी व कर्मचारी यांना सप्रेम भेट देण्याबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ७५(४) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, सहस्त्रकालीन नविन वर्षानिमित्ताने बँकेच्या पदाधिकारी, माननीय संचालक, अधिकारी व कर्मचारी यांना स्मृतीचिन्ह" म्हणून भेट द्यावयाची आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या पदाधिकारी, संचालक अधिकारी व कर्मचारी यांना सहस्त्रकालीन नविन वर्षानिमित्ताने "स्मृतीचिन्ह" देण्याबाबत तसेच "स्मृतीचिन्हाची" मर्यादा रकमेबाबत किती असावी या बाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष महोदय यांना देण्यात येत आहे, असे ठरले.

सुचक:- मा. श्री. ब. भा. तायवाडे
अनुमोदक:- मा. श्री र. व्यं. निमजे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७५(५) :- ओरीसा राज्यातील वादळग्रस्तांना आर्थिक सहाय्य करणेबाबत. --

ठराव क्रमांक ७५(५) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, ओरीसा राज्यांत वादळामुळे तेथील परिस्थिती फारच बिकट झालेली आहे. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी या वादळग्रस्तांना आर्थिक मदत करावी असे कळविले आहे. कारगील निधीस पाठवावयाची रुपये ३.०० लाख मदतीचा निधी असून पाठवायचा आहे. यात बँकेचे कर्मचाऱ्यांनी पगारातून गोळा केलेला निधी रु. १४६०३/- असून बँकेचा निधी रुपये ७५३१९९/- आहे. हा निधी रुपये ३.०० लाख कारगील सैनिक सहाय्यता निधीस न पाठविता ओरीसा राज्यातील

वादळग्रस्तांना मदत करणेसाठी मुख्यमंत्री सहायता निधीस पाठवावा किंवा कसे ह्या बाबत सभेने निर्णय घ्यायचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कारगिल सैनिक सहाय्यता निधीस पाठवावयाच्या रुपये ३.०० लाखाच्या निधी कारगिल सैनिक सहायता निधीस तसेच ओरिसा राज्यातील वादळग्रस्तांचे मदतीकरिता न पाठविता नागपूरातील मुकबधीर संस्था, ब्लाईंड रिलिफ असोशिएशन, कॅन्सर रिलिफ सेंटर हॉस्पीटल यांना प्रत्येकी रुपये १.०० लाखाची मदत म्हणून देणगी देण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १५(६) :- सहकारी संस्था मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था तसेच वैयक्तिक सभासदांना संगणक (काम्पुटर) खरेदीकरिता कर्ज धोरण मंजूरीबाबत..

ठराव क्रमांक १५(६) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सध्याचे परिस्थितीमध्ये मनुष्य बळावरील कामाच्या ताण कमी करण्यासाठी तसेच जलदगतीने कामे होण्यासाठी संगणकाद्वारे काम पूर्ण करणे, याला आधुनिक युगांत महत्व प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने बँकेकडे संगणक खरेदीसाठी सर्व स्तरावरून मागणी होत आहे. इतर बँकांचे स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आपले बँकेकडून देखील कर्ज पुरवठा करणे गरजेचे झाले आहे. ही बाब विचारांत घेऊन संगणक खरेदीसाठी कर्ज पुरवठा धोरण तयार केले आहे. त्या अनुषंगाने संगणक खरेदीसाठी याप्रमाणे तयार करण्यांत आलेल्या कर्ज पुरवठा धोरणास मान्यता देण्यांत आली असून सदर कर्ज धोरणांत व अटीत आवश्यकतेनुसार फेरबदल करण्याचा अथवा अधिकच्या अटी टाकण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

संगणक खरेदीसाठी कर्ज पुरवठा धोरण :—

---

अ) कर्ज धोरण -

१. बँकेकडून संगणक व त्याचे पुरक साहित्य खरेदीसाठी कोटेशनमधील किंमतीच्या ७५% पर्यंत किंवा जास्तीत जास्त रुपये २.०० लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून देता येईल.

२. जिल्ह्यातील अधिकृत व नामवंत विक्रेत्याकडून यांनी पुरविलेल्या कोटेशननुसार संगणक खरेदी करावी लागतील.

३. कोटेशन किंमतीनुसार २५% रक्कम स्वगुंतवणुक अर्जदारास कर्ज उचलण्यापूर्वी बँकेत जमा करावी लागेल.

४. या अंतर्गत दिलेल्या रुपये ५०,०००/- पर्यंतच्या कर्जाची व्याजासह

समान ४८ मासिक कर्ज हप्त्यात परतफेड करावी लागेल.

५. वैयक्तिक सभासद / सहकारी संस्थांचा व्याज दर.–

या कर्जाचा व्याजदर द.सा.द.शे. ११% राहणार असून मुदतीच्या आंत परतफेड न झालेल्या थकित कर्ज रकमेवर १८% व्याजदराने व्याज आकारणी केली जाईल. सहकारी संस्था, वैयक्तिक कर्जदारास दरमहा मासिक हप्तांत व्याजासह कर्ज परतफेड करावयाची असून महिना अखेर ड्यू झालेला कर्ज हप्ता पुढील महिन्याचे १० तारखेपर्यंत जमा करावा लागेल. मुदतीच्या आंत जमा न केल्यास कर्ज हप्ता थकित झाला असे समजण्यात येईल.

६. शैक्षणिक संस्थांचा व्याज दर.–

शैक्षणिक संस्थेला शासनाकडून मिळणारी नॉन सॅलरी ग्रँटची रक्कम साधारणतः वर्षातून दोनदा मार्च व सप्टेंबर पूर्वी मिळत असल्यामुळे अशा शैक्षणिक संस्थेला या कर्जाची परतफेड व सहामाही ८ ते १० समान कर्ज हप्त्यांत व्याजासहीत करावयाची आहे. कर्ज परतफेड सहामाही असल्याने या कर्जाचा व्याजदर द.सा.द.शे. १६% राहील. तसेच कर्ज हप्ता थकित झाल्यास थकित रकमेवर १०% जादा व्याजदराने आकारणी केली जाईल.

ब] <u>कर्ज मिळण्यास आवश्यक पात्रता :</u>

<u>वैयक्तिक कर्जदार</u>

१. कर्ज मागणी करणारा अर्जदार नोकरीत असेल व त्याचे पगार बँकेमार्फत होत असल्यास कर्ज वसुलीबाबत महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६० चे कलम ४९(२) नुसार एम्प्लॉयरचे हमीपत्र द्यावे लागेल.

२. अशा प्रकारच्या लाभार्थीचे बाबत मिनिमम वेजेस ॲक्टनुसार सदर कर्ज व इतर सर्व प्रकारच्या कपाती वजा जाता किमान ५५% पगार अर्जदारास मिळेल याची पडताळणी करूनच कर्ज मंजूर करण्यांत येईल.

३. पगारदार व्यतिरिक्त इतर वैयक्तिक अर्जदारास कर्ज रकमेच्या किमान दिडपट रकमेची सेक्युरिटी गहाणांत द्यावी लागेल. जसे स्थावर मालमत्ता बँक मुदती ठेवींच्या पावत्या, विमा पॉलीसी, एन.एस.सी., इंदिरा विकास पत्र इत्यादि गहाणांत देवून त्यावर बँकेचा कर्जबोझा नोंद करावी लागेल.

<u>सहकारी संस्था –</u>

१. संगणक खरेदी करिता कर्ज घेण्यासंबंधी व त्याकरिता उचल करण्याचा अधिकार देण्याबाबतचा संस्थेच्या संचालक मंडळाचा

ठराव त्याप्रमाणे बँकेच्या अटी व नियम मान्य असल्याचा ठराव कर्ज मागणी अर्जासोबत द्यावा लागेल. या व्यतिरिक्त कर्जास तारण म्हणून कर्ज रकमेइतपत तारण द्यावे लागेल. तारणांत संस्थेच्या मुदती ठेवी, भविष्य निर्वाह निधी फंड गुंतवणूक, किसान विकास पत्रे, एनएससी, मुदती बाँड, विमा पॉलिसी इत्यादि ठेवून त्यावर बँक कर्जाची लीन नोंदवावी लागेल व ही सर्व कागदपत्रे बँकेच्या दप्तरी जमा करावी लागेल.

<u>शैक्षणिक संस्था</u>

१. ज्या शैक्षणिक संस्था शासन मान्यताप्राप्त आहेत आणि ज्यांना शासनाची शैक्षणिक ग्रँड मिळत आहे. अशा संस्था या कर्जास पात्र राहतील.

२. शैक्षणिक संस्थांना शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांचे सदर कर्ज घेण्याबाबत शिफारस पत्र द्यावे लागेल. त्यासोबत शाळा कमेटीचा नॉन सॅलरी ग्रँड मधून व्याजासह कर्ज हप्त्याची रक्कम परस्पर वसुली करण्याबाबत संमती असलेला संयुक्त सहीचा ठराव सादर करावा लागेल. (संयुक्त सहीमध्ये मुख्याध्यापक तथा संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांची सही आवश्यक राहील)

३. वैयक्तिक सभासद, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था, यांचे ठेव खाते ज्या शाखेत आहेत त्या शाखेमार्फत कर्ज मागणी अर्ज सादर करावा लागेल.

४. वैयक्तिक सभासद बँकेशी व्यवहार असणारे दोन जमानतदार द्यावे लागतील.

५. वैयक्तिक सभासद, शैक्षणिक संस्था व जमानतदार यांना बँकेचे नॉमिनल सभासद आवश्यक फी भरून व्हावे लागेल.

६. सहकारी संस्थांना बँकेचे सभासद व्हावे लागेल.

७. कर्ज मागणीसाठी विहित नमुन्यात अर्ज करून सर्व आवश्यक दस्तऐवजासह मागणी अर्ज संबंधित शाखेत सादर करावा लागेल.

८. कर्जावर घेण्यात आलेली वस्तू कॉम्पुटर व पुरक साहित्य बँकेच्या नजर गहाणात देण्यासाठी नजरगहाण-खत करून द्यावे लागेल.

९. कर्जाकरिता करावयाच्या करारनामा व अनुषंगिक आवश्यक कागदपत्रावर प्रति रु. १.०० लाख कर्ज रकमेस रु.१००/- चे अधेसिव्ह स्टँप लावून कागदपत्रे सादर केल्यानंतरच प्रत्यक्ष कर्ज उचल देण्यात येईल.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७५(७) :- मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोरेज प्रा. लि. नागपूर ला नविन कोल्ड स्टोरेज उभारणीसाठी बँकेने मंजूर केलेल्या रु.१७०.०० लाख दिर्घ मुदती कर्जापोटी नाबार्डकडे फेरकर्ज मागणी करणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७५(७) :— मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला

माहिती दिली की, मे० वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा.लि.नागपूर यांना कळमना मार्केट यार्ड परिसरांत नविन कोल्ड स्टोअरेज उभारणीसाठी बँकेने रुपये १७०.०० लाख दिर्घ मुदती कर्ज उपलब्ध करुन देणेबाबत बँकेचे मा०संचालक मंडळ सभा दि० ७-१२-१९९९चे ठराव क्रमांक अनुसार मंजूरी दिली आहे. सदर प्रकल्प अहवाल राज्य सहकारी बँकेमार्फत नाबार्डचे मान्यतेसाठी पाठविलेला आहे. या कर्जापोटी बँकेला नाबार्डकडून फेर कर्ज पुरवठा उपलब्ध होऊ शकत असल्याने नाबार्डकडे फेर कर्जासाठी मागणी करावी लागेल.

यावर सभेत विचार विनिमय होऊन मे० वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा० लि० नागपूर यांना मंजूर केलेल्या रु.१७०.०० लाख दिर्घ मुदती कर्जापोटी नाबार्डकडे फेरकर्ज मागणी करावी याबाबत नाबार्डच्या अटीव शर्ती बँकेला मान्य राहतील असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर मा० अध्यक्ष यांनी धापेवाडा सेवा सहकारी सोसायटीचे सभासदांची विनंती वाचून दाखविण्यात आली. व त्या अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, जिल्हा सहकारी बँकामार्फत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने स्वनिधीतून सवलतीच्या व्याजदराने शेतकऱ्यांना दुभती जनावरे खरेदीकरिता कर्जपुरवठा करण्याची योजना १९९७ मध्ये जाहिर केली होती. सदर योजनेचा बहुसंख्य शेतकरी सभासदांनी फायदा घेतला. या योजनेअंतर्गत आपल्या बँकेमार्फत शेतकरी सभासदांना दुभती जनावरे खरेदीसाठी सवलतीच्या व्याज दराने कर्जपुरवठा करण्यात आला. सदर योजने अंतर्गत राज्य बँकेने १००% फेरकर्जपुरवठा करण्याचे मान्य केल्या-प्रमाणे फेरकर्ज मर्यादा मंजूरीसाठी सन १९९१-९२ मध्ये अर्ज करण्यांत आले. परंतु महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून मर्यादा मंजूर झाली नाही. उलट सदर योजने अंतर्गत सवलतीच्या व्याजदराची अट रद्द करुन हे व्याज दर नेहमीच्या व्याजदरानुसार वाढविण्याबाबत कळविले.

सदर योजने अंतर्गत दुधाळू जनावरे खरेदी केलेल्या शेतकरी सभासदांनी सवलतीचे व्याजदराची सवलत बंद करुन नेहमीचेच व्याज दराने व्याज आकारण्यांत आल्याबाबत धापेवाडा सेवा सहकारी संस्था सभासदांनी कळविले असून, त्याच अर्जात त्यांनी विनंती करुन सवलतीचे व्याजदराने व्याज आकारणी करण्यांत आल्यास, येणाऱ्या व्याजासह संपूर्ण रकमेची एकमुस्त परतफेड करण्याची तयारी दाखविली आहे.

सदर विनंतीवर चर्चा करतांना मा०श्री. र.गो. बंग, संचालक

म्हणाले की, सदर योजनेअंतर्गत सवलतीच्या व्याजदराने दुधाळू जनावरे खरेदीसाठी कर्जपुरवठा केलेल्या शेतकऱ्यांकडील कर्जवसुली थांबवावी व त्यांना सवलतीच्या व्याजदराने आकारणी करावी आणि या अडचणीतून मार्ग निघण्यासाठी महा. राज्य सहकारी बँकेला विनंती करण्यात यावी असे सुचविले. यावर मा. अध्यक्ष म्हणाले की, ज्या शेतकऱ्यांना सवलतीच्या व्याजदराने या योजनेअंतर्गत दुधाळू जनावरे खरेदीसाठी कर्जपुरवठा करण्यात आला, अशाच शेतकऱ्यांना सवलतीचे व्याजदराचा फायदा मिळावा. यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांना विनंती करण्यांत यावी असे सांगितले.

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक — अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. नागपूर.

वाचन केले
[illegible]
(बँक) नागपूर.

2000 - 2001

(१)

बँकेच्या मा० संचालक मंडळाची सभा शनिवार दिनांक ८-४-२००० रोजी दुपारी १-०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनिल केदार | अध्यक्ष |
| २. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा. श्री. र. गो. बंग | संचालक |
| ४. | मा. श्री. र. पां. गावंडे | " |
| ५. | मा. श्री. भा. चं. शहाणे | " |
| ६. | मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ७. | मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ८. | मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ९. | मा. श्री. चं. ल. कोल्हे | " |
| १०. | मा. श्री. आ. र. देशमुख | " |
| ११. | मा. श्री. सं. लि. चोरे | " |
| १२. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| १३. | मा. श्री. वि. रा. हुलके | " |
| १४. | मा. श्री. ना. र. जीभकाटे | " |
| १५. | मा. श्री. वि. आ. राऊत | " |
| १६. | मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १७. | मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| १८. | मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १९. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | " |
| २० | मा. श्री. मु. भि. पन्नासे | " |
| २१ | मा. श्री. अ. शं. धार्मिक | " |
| २२. | मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| २३. | मा. श्री. चं. लु. समर्थ | " |
| २४. | मा. सौ. स्मिताताई कुंभारे | संचालीका |
| २५. | मा. सौ. कुसुमताई किंमतकर | " |
| २६. | मा. श्री. एल. जी. चौधरी | कर्मचारी प्रतिनिधी |
| २७. | मा. श्री. व्ही. जी. शहाणे | " |
| २८. | मा. श्री ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

- अनुपस्थित -

१. मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर
२. मा. श्री. सुरेशराव देशमुख, प्रतिनिधी, म.रा.सह.बँक लि. मुंबई.
३. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
४. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह.संस्था (बँक) नागपूर.
५. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
६. मा. विभागीय अधिकारी, महा.राज्य सह.बँक म. विभागीय कार्यालय, नागपूर.

सभेला उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कार्यवाहिस सुरुवात करण्यापूर्वी बँकेचे संचालक मा. श्रावणजी निमजे व महराष्ट्र राज्य सहकारि बँकेचे माजी अध्यक्ष व, सहकार क्षेत्रांतिल जेष्ठ नेते मा. विष्णु अण्णा पाटिल यांचे निधनाबद्दल सभेला माहिती दिली. सभेत दोन मिनिटे उभे राहून मुक श्रध्दांजली अर्पण करण्यात आली, व दुःखवटयाचा खालिलप्रमाणे ठराव करुन तो संबंधीतांना पाठविण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

- दुःखवटयाचा ठराव -

"बँकेचे संचालक मा. श्रावण बिल्कंठराव निमजे यांचे दिनांक ११.२.२००० रोजी अकस्मात निधन झाले. त्यांनी कबीर विणकर सोसायटीचे संचालक, नागपूर विणकर सहकारी सुत गिरणीचे उपाध्यक्ष, विदर्भ केंद्रीय सहकारी सोसायटीचे संचालक, नगर परिषद खापाचे नगरसेवक अशा अनेक पदावर राहून नेतृत्व केले आहे. त्यांचे निधनाने आपण एका उत्कृष्ठ सहकार्यास मुकलो आहोत. तसेच राजकीय, सामाजीक आणी सहकारी क्षेत्रातील जेष्ठ नेते माननीय श्री विष्णु अण्णा पाटिल यांचे दिनांक १२-२.२००० रोजी हृदय विकाराने अकस्मात निधन झाले. त्यांनी सांगली शेतकरी सह. साखर कारखान्याचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सह. बँकेचे अध्यक्ष, सहकारी साखर संघाचे अध्यक्ष या सारख्या राज्य पातळीवरील अनेक सह. व सामाजिक संस्थांचे नेतृत्व केले आहे. सध्या ते विद्यमान आमदार होते. त्यांचे निधनाने एका निगर्वी, संयमी, मर्यादाशिल अशा नेतास व सहकाराच्या महा मेरुस मुकलो आहोत.

मा. श्रावणजी निमजे व मा. विष्णु अण्णा पाटील यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबीयांवर ओढवलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. परमेश्वर त्यांचे कुटुंबीयांना दुःख सहन करण्याची शक्ती देवो, मृतकाचे आत्म्यास शांती आणि सद्गती देवो ही प्रभूचरणी प्रार्थना."

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेच्या कामकाजास माननीय अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक ५।२।२००० व दिनांक ११।२।२००० रोजी झालेल्या सभांचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले, व मागील संचालक मंडळ सभा दिनांक ११।२।२००० मधील पारीत झालेल्या ठराव क्रमांक ४चे अनुषंगाने चर्चा करतांना मा० अध्यक्ष यांनी सभेस सांगितले की, बिगर शेती थकबाकीदार संस्थांकडून बँकेकडील थकित कर्जवसुलीसाठी कोर्टाकडून बँकेला अवार्ड प्राप्त झालेले आहेत. अवार्डची प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना काही अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्यात संस्थांकडील थकबाकी ही संस्थेकडे असलेल्या संपत्तीपेक्षा जास्त असल्यामुळे थकबाकीच्या अवार्डचे अंमलबजावणी करतांना बँकेच्या पूर्ण थकबाकीची रक्कम वसूल होणार नाही व त्यामुळे बँकेचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत सभेत सविस्तर चर्चा होऊन चर्चे अंती अशा संस्थांचे बाबतीत माननीय विभागीय सह निबंधक, मा० जिल्हा उपनिबंधक, मा. सहकार आयुक्त यांचेकडून मार्गदर्शन मागविण्यांत यावे व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

तसेच विषय क्र.१०चे अनुषंगाने पारीत झालेल्या ठरावाबाबत चर्चा करतांना बँकेचे संचालक मा० ग० के० शाहीर म्हणाले की, विणकर संस्थांचे बाबतीत व्याजदर १% कमी करणेबाबत मा० संचालक मंडळाने निर्णय घ्यावा अशी विनंती केली. त्यावर मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, विणकर संस्थांचे कर्जावरील व्याजदर कमी करण्याचा प्रस्ताव मा० संचालक मंडळाचे ठरावासह नाबार्डकडे यापूर्वीच पाठविला असल्याने त्यावर पुन्हा वेगळा ठराव घेण्याची आवश्यकता नाही. नाबार्डकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दि.५.२.२००० व दिनांक ११.२.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक २:- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुसार

मा॰ सरव्यवस्थापक यांनी मागिल दि॰ ५.२.२००० व दि॰ ११.२.२००० रोजीचे सभांमध्ये पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत चर्चा करतांना मा॰ अध्यक्ष यांनी सांगितले की, अवार्ड मिळाले असले तरी पाहिजे त्या प्रमाणात कार्यवाही होवु शकली नाही. कारण लिलाव करूनही कर्ज पूर्ण वसुल होत नाही. यामुळे उर्वरित रकमेच्या वसुलीचा प्रश्न निर्माण होतो. याकरिता अशा प्रकरणी सहकार खात्याकडून मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागिल सभेत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ३ :- महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या कापूस सहभाग योजनेत पुनश्च रुपये ५०.०० कोटीची गुंतवणुक करणेबाबत केलेल्या सर्क्युलर ठरावास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, एकाधिकार कापूस खरेदी योजना १९९९-२०००चे हंगामाकरिता आपले बँकेच्या सहभाग अंतर्गत रुपये ५०.०० कोटीचा निधी मा. संचालक मंडळाचे दिनांक ८।६।१९९९चे सभेत निर्णय घेऊन गुंतविण्यांत आला आहे. कास्तकारांना कापसाचे पेमेंट वेळेवर होण्याकरिता निधीची आवश्यकता असल्याने बँकेला शासन व राज्य सहकारी बँकेकडून कापूस सहभाग योजनेत गुंतवणुक करण्यास वेळोवेळी मागणी करण्यांत येत आहे. या सर्व बाबींचा विचार करून बँकेकडे उपलब्ध असलेला अतिरिक्त निधी कापूस सहभाग योजनेत रुपये ५०.०० कोटी गुंतविण्यास दिनांक ११।३।२००० रोजी केलेल्या खालिल सर्क्युलर ठरावास सभेत सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

-: सर्क्युलर ठराव :-

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून प्राप्त झालेल्या पत्र क्र. कृअा.मा./कापूस/कर्ज सहभाग/फा-५०६/२६८२२/९९-२००० दिनांक २८।८।१९९९ नुसार महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस सन १९९९-२००० हंगामातील कापूस खरेदी करण्याकरिता रुपये ८९५/- कोटी कर्ज मर्यादेची मागणी केली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने मागिल वर्षाप्रमाणे सहभाग योजनेअंतर्गत बँक किती रकमेची गुंतवणुक करू शकेल याची विचारणा केल्यानुसार बँकेनी दिनांक ३।२।२००० पर्यंत रुपये ५०.०० कोटीची गुंतवणुक केली होती. त्यानंतर मा॰ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक २० जानेवारी २०००, महाराष्ट्र

राज्य सहकारी बँकेचे पत्र क्र. कृ.औ.वि/कापूस/फा-५०१/५३२२, दिनांक १७/२/2000 या पत्रानुसार अतिरिक्त निधी गुंतविण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार रूपये ५०.०० कोटीची अतिरिक्त गुंतवणुक सहभाग योजनेत करण्याची मान्यता देण्यांत येत आहे. तसेच याकरिता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व लिड बँक म्हणून राज्य सहकारी बँक यांच्यात करावयाच्या करारातील अटीस मान्यता देण्यांत येत आहे. या योजनेअंतर्गत वेळोवेळी चर्चा करून निर्णय घेणे, दस्ताऐवजावर सह्या करणे याकरिता बँकेचे सरव्यवस्थापक अथवा त्यांचे अनुपस्थितीत बँकेचे प्रभारी व्यवस्थापक यांना अधिकार देण्यांत येत आहे, असे ठरले."

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४ :- प्रगती महिला औद्योगिक उत्पादक संस्था मर्या., नरखेड (अवसायनातील) या संस्थेचे शेअर्स परत करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, प्रगती महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्या., नरखेड, रजि. नं. १७७ ही संस्था मर्या. बँकेची सभासद आहे. ही संस्था गेली ~~असल्याने~~ आहे. व ह्या संस्थेचे अवसायकांनी बँकेत असलेले शेअर्सची रक्कम परत मिळावी म्हणून बँकेकडे दिनांक ३/५/१/२०००रोजी अर्ज सादर केला आहे. या संस्थेचे अवसायकांनी रूपये १००/-चे शेअर्स सर्टीफिकेट अर्जासोबत जोडले आहे. ही संस्था बँकेची कर्जदार संस्था नाही व या संस्थेनी बँकेचे कर्ज घेतले नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन प्रगती महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था म. नरखेड या संस्थेचे शेअर्सची रक्कम रूपये १००/— संस्थेला परत करण्यांत यावे व संस्थेचे सभासदत्व रद्द करून तसे पत्राद्वारे संस्थेला व सहकारी खात्यास कळविण्यांत यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५ :- सन २०००-२००१ सालाकरिता अल्पमुदत शेती कर्ज मर्यादा रूपये ३५.०० कोटीची मागणी करणेकरिता ठराव करून महाराष्ट्र राज्य बँकेचे मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करणे.

ठराव क्रमांक ५ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मागील वर्षी रूपये २६००.०० लाखाची मर्यादा मंजूर झालेली होती. चालु वर्षात खते, बियाणे व औषधी यांचे

वाढीव भाव विचारांत घेता रुपये 4000.00 लाखापर्यंत लघु कर्जाचे वाटप होईल असा अंदाज आहे. करिता राज्य बँकेकडून रुपये 3500.00 लाखाची शेतकी लघु कर्ज मर्यादा मंजूर करण्याकरिता प्रस्ताव सादर करावा लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन राज्य सहकारी बँकेकडून रुपये 3500.00 लाख शेतकी लघु कर्ज मर्यादा मंजूर करण्याकरिता खालील प्रमाणे ठराव करून प्रस्ताव ठरावासह राज्य सहकारी बँकेकडे पाठविण्यास मान्यता देण्यांत आली.

## — RESOLUTION —

"Resolved to borrow during the year 2000-2001 an amount of Rs. 3500.00 Lakhs only (Rs. Thirty five Hundred Lakhs only) out of which Rs. 200.00 Lakhs only (Rs. Two Hundred Lakhs only) for Oil Seeds Production Programme, Rs. 10.00 Lakhs only (Rs. Ten lakhs only) for N.P.D.P. and Rs. 20.00 Lakhs (Rs. Twenty Lakhs) only for financing S.A.O. for Tribals, from The Maharashtra State Cooperative Bank Ltd., Bombay (Incorporating The Vidarbh Cooperative Bank ltd.,) to apply for a Credit limit for the like sum to The National Bank for Agriculture and Rural Development under section 21 (i) read with section 21 (3) (b) or section 21 (3) (a) for seasonal Agricultural operations."

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६ :- बँकेचे पोटनियम क्रमांक २६ (xviii) नुसार पुढील कालावधी करिता व्यवस्थापक समिती, कर्ज उपसमिती, सेवक उपसमिती व इतर उपसमित्यांची नियुक्ती करणे.

ठराव क्रमांक ६ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या पोटनियमांतील तरतुदीनुसार आमसभेनंतर होणाऱ्या पहिल्या संचालक मंडळाचे सभेत नविन समित्यांची नियुक्ती करण्यांत येते. त्यानुसार नविन समित्यांची नियुक्ती करावी लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे पोटनियम क्रमांक २६ (xviii) नुसार पुढील कालावधीकरिता व्यवस्थापक समिती, तसेच बँकेचे पोटनियम क्रमांक २६ (xix) नुसार कर्ज उपसमिती व इतर उपसमित्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार माननीय अध्यक्ष व

माननीय उपाध्यक्षा यांना देण्यांत येत आहे, असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७ :- बँकेचे पोटनियम क्रमांक २६ (xxvi) नुसार पुढील कालावधी करिता बँकेला संलग्न असलेल्या संस्था व इतर संस्थांवर प्रतिनिधी नियुक्ती करणे.

ठराव क्रमांक ७ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या पोटनियम क्रमांक २६ (xxvi) नुसार पुढील कालावधीसाठी बँकेला संलग्न असलेल्या ~~खालिल~~ संस्था तसेच इतर सहकारी संस्थावर प्रतिनिधींची नियुक्ती करायची आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेला संलग्न असलेल्या संस्था वर व इतर संस्थांवर बँकेचे पोटनियम क्रमांक २६ (xxvi) नुसार पुढील कालावधीकरिता प्रतिनिधी नियुक्त करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष व मा० उपाध्यक्षा यांना देण्यांत येत आहेत, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ८ :- मे० वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा० लि० नागपूर यांचे खेळते भांडवल कॅश क्रेडीट मर्यादा रू.३२५.०० लाख मंजूरीसाठी सादर केलेल्या प्रकल्प अहवालास मंजूरीबाबत व सदर प्रकल्प अहवाल पुढील मान्यतेस राज्य सहकारी बँकेमार्फत नाबार्डकडे पाठविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मे० वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा० लि० कळमना नागपूर यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूरचे कळमना मार्केटयार्ड मध्ये १ लाख बॅग्ज साठवणूक क्षमतेचे कोल्ड स्टोअरेज ची उभारणी केली असून त्याकरिता बँकेने रूपये ७७०.०० लाख मुदती कर्ज उपलब्ध करून दिले आहे. कोल्ड स्टोअरेजचे काम संपूर्ण झाले असून माल साठवणुकीकरिता ते कार्यरत झाले आहे.

सदर कोल्ड स्टोअरेज मध्ये साठवणुक केलेल्या मालाचे तारणावर शेतकरी/व्यापारी यांना कर्ज पुरवठा करता यावा यासाठी कंपनीने बँकेकडे रूपये ३२५.०० लाख कॅश क्रेडीट कर्ज मर्यादा मंजूरीकरिता अर्ज सादर केलेला आहे. अर्जासोबत आवश्यक आर्थिक पत्रके व प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे.

बँकेचे प्रचलित कर्ज धोरणानुसार शेतकरी/व्यापारी यांनी साठवणूक केलेल्या मालाचे बिल्टीचे तारणावर त्या दिवशीचे बाजारभावाप्रमाणे ५५% रकमेपर्यंत ६ महिने मुदतीसाठी एका खातेदारास जास्तीत जास्त रुपये १०.०० लाखापर्यंतच्या रकमेचा कर्जपुरवठा करण्याचे धोरण आहे. परंतु साठवणुक केलेला माल मोठ्या प्रमाणावर असल्यास सदर शेतकरी/व्यापारी, इतर नागरी/राष्ट्रीयकृत बँकेकडे तारणावर माल ठेवून कर्ज सुविधा उपलब्ध करुन घेतील. त्यामुळे या कोल्ड स्टोअरेजमध्ये साठवणूक केलेल्या मालावर निरनिराळ्या बँकेतर्फे कर्ज पुरवठा करण्यांत येईल. त्यामुळे कर्ज पुरवठा एकाच बँकेकडून न झाल्यास बँकेला नियंत्रण ठेवण्यास अडचणीचे होईल. त्यामुळे साठवणूक केलेल्या मालाचे तारणावर कर्ज पुरवठ्याचे व्यवहार एकाच बँकेमार्फत होण्यासाठी मे० वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज यांनी रुपये ३२५.०० लाख खेळते भांडवली कर्जाची मागणी केलेली आहे.

सादर केलेल्या प्रकल्प अहवालानुसार मे० वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज मध्ये साठवणुक केलेल्या मालाचे तारणावर बँक ज्या व्याजदराने कर्ज पुरवठा करणार आहे. तोच व्याजदर सभासदास आकारणी करणार आहे. तसेच सभासदाने कोल्ड स्टोअरेजमध्ये साठवणुक केलेल्या मालाचे किंमतीचे ७०% रक्कम बिल्टीचे तारणावर कोल्ड स्टोअरेजकडून अदा करण्यांत येईल व या प्रकारे कोल्ड स्टोअरेजने अदा केलेल्या कर्ज रकमेच्या ९०% रक्कम बँकेकडून कोल्ड स्टोअरेजला बँक मंजूर करेल. उदा० साठवणूक केलेल्या मालाची किंमत रुपये १००/- असल्यास सभासदास रुपये ७०/- कर्ज मिळेल. त्यांत ९०% रक्कम म्हणजे रुपये ६३/- बँक कर्ज व १०% रक्कम म्हणजे रुपये ७/- कंपनी स्वनिधीतून कर्ज पुरवठा करणार आहे.

सदर प्रकल्प अहवाल बँकेचे पॅनेलवरील चार्टर्ड अकाउंटंट श्री. पी. एस. ठाकरे यांनी छाननी करुन प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याचे व यांत कर्ज-निधी उपलब्ध करुन देण्याबाबत अभिप्राय दिला आहे. त्यांनी दिलेला अभिप्राय विचारांत घेवून बँकेचे कर्ज धोरण खालीलप्रमाणे ठरवावे लागेल.

कर्ज धोरण —

१. बँकेने मंजूर केलेल्या कर्ज रकमेचा उपयोग मे० वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेजमध्ये शेतकरी/व्यापारी यांनी साठवणुक केलेल्या शेतमालाचे तारणावर कर्ज देण्यासाठीच करता येईल. याकरिता साठवणुक केलेल्या मालाचे किंमतीच्या ७०% रक्कम कंपनीमार्फत साठवणुकदारांना कर्ज म्हणून उपलब्ध करुन द्यावयाची असून यापैकी कर्ज रकमेच्या ९० टक्के रक्कम बँक कंपनीला उपलब्ध करेल. उर्वरित १०% रक्कम कंपनीला स्वनिधीतून उपलब्ध करुन द्यावी लागेल.

२. कोल्ड स्टोअरेज मध्ये साठवणूक केलेल्या मालाची गुणवत्ता व वजन याची शहानिशा कंपनीने करून तयार केलेली बिल्टी बँकेला लिन करून द्यावी लागेल.

३. कंपनीने लिन नोंद केलेली बिल्टी व बाजारभाव प्रमाणित करण्यासाठी कृषिउत्पन्न बाजार समितीचे प्रमाणपत्र कर्ज मागणी अर्जासह बँकेचे शाखेकडे सादर करावे लागेल.

४. सदर माल मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा. लिमि. नागपूर यांचे स्टोअरेजमध्ये असल्याने व माल त्यांचे ताब्यात असल्याने संबंधित मालकाच्या धारक म्हणून कंपनीला बँकेचे विहित नमुन्यात (गॅरन्टी) ट्रस्ट रिसिप्ट बँकेला करून द्यावी लागेल.

५. कोल्ड स्टोअरेजमध्ये साठवणुक केलेल्या मालावर इतर कुठल्याही बँकेचा बोझा नाही किंवा सदर माल कोणत्याही बँकेला तारणांत दिलेला नाही, याची शहानिशा कंपनीने करून तसे प्रतिज्ञा पत्र कंपनीला बँकेचे नांवाने करून द्यावे लागेल.

६. या योजनेअंतर्गत कंपनीच्या सहयोगी कंपनीने खरेदी केलेला माल साठवणुक करता येईल, परंतु सदर मालावर कोणत्याही बँकेकडून कर्ज घेतले नसल्याबाबत रुपये २०/- चे स्टॅम्प पेपरवर साठवणूक करणाऱ्या कंपनीला प्रतिज्ञा पत्र करून द्यावे लागेल.

७. या योजने अंतर्गत केलेल्या कर्जाची मुदत ९ महिनेपर्यंत राहिल. ९ महिने नंतरचे कर्ज थकित कर्ज समजण्यांत येवून त्यावर १% जादा दराने व्याजाची आकारणी करण्यांत येईल. त्यानंतर मंजूर मुदतीच्या आंत माल न सोडविल्यास कंपनीचे किंवा सहयोगी कंपनीचे कुठल्याही खात्यातून रक्कम कर्ज खात्याकडे वळती करण्याचा अधिकार बँकेला राहील.

८. प्रकल्प अहवालांत दर्शविल्यानुसार व्याजदर द.सा.द.शे. १६% टक्के राहील. व्याजाची आकारणी दर तिमाही सप्टेंबर/डिसेंबर/मार्च/जून अखेर करण्यांत येईल. व्याजाची रक्कम ३ दिवसांत जमा न झाल्यास व्याजाची रक्कम कर्जखाते नांवे करून वसुल करण्याचा अधिकार बँकेला राहील.

९. साठवणुक केलेल्या मालाच्या पुरेशा रकमेचे कर्ज मुदतीचे कालावधीचा विमा कंपनी व बँक यांचे संयुक्त नांवाने काढून पॉलीसी बँकेला सादर करावी लागेल.

१०. साठवणुक केलेल्या मालाची किंमत कृषिउत्पन्न बाजार समिती यांचे प्रमाणपत्रावरील किंमत ग्राह्य धरून कर्ज रक्कम निश्चित करण्यांत येईल.

११. साठवणुक केलेल्या मालाची तपासणी, नाबार्ड/राज्य सहकारी बँक/जिल्हा सहकारी बँकेचे अधिकारी यांना करण्याचा अधिकार राहील.

१२. वरील अटी व्यतिरिक्त अधिकच्या अटी घालण्याच्या किंवा अटीत बदल करण्याचा अधिकार बँकेला राहील.

१३. बँकेचे गहाणातील बिल्टी परत घेतांना करावयाची पूर्तता —

बँकेचे गहाणातील बिल्टी सोडवितांना प्रथम बिल्टीच्या मुळ रकमेच्या प्रमाणांत दिलेल्या कर्जाची संपूर्ण रक्कम कर्ज खाती भरणा केल्यानंतरच बिल्टी सोडवून दिल्या जाईल व त्यासाठी कंपनीला बिल्टी परत करण्याबाबतचे पत्र बँकेला द्यावे लागेल.

मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज उभारणीकरिता बँकेने रु.७००.०० लाख मुदती कर्ज पुरवठा करतांना कर्जाचे तारणांत त्यांची सहयोगी कंपनी मे. वाधवानी कोल्ड स्टोअरेज अँड आईस प्लँन्ट प्रा.लि., कळमना, नागपूर यांचे कळमना मार्केट येथील सद्या कार्यरत असलेले कोल्ड स्टोअरेज सह तारण म्हणून बँकेला रजिष्टर करार करुन दिलेला असून तारणातील मालमत्तेची किंमत रुपये ६५०.०० लाख आहे. तसेच या करारामध्ये कंपनीला दिलेल्या मुदती कर्ज सोबतच वरील प्रमाणे अपेक्षित असलेले कॅश क्रेडीट कर्जाचा समावेश केलेला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा घेऊन मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा.लि. नागपूर या कंपनीला साठवणुक केलेल्या मालाचे तारणावर साठवणुकदाराला कर्ज पुरवठा करण्यास रुपये २५०.०० लाख कॅश क्रेडीट मर्यादा दिनांक ३१/३/२००७ पर्यंतचे मुदतीसाठी कर्ज निधी उपलब्ध करुन देण्यास मंजूरी देण्यात आली. व सदर प्रकल्प अहवाल राज्य सहकारी बँकेमार्फत नाबार्ड मान्यतेसाठी पाठवावा. असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६ :- जिल्ह्यातील किमान पांच एकर जमीन धारणा असलेल्या अल्पभुधारक शेतकऱ्यांकरिता बँकेने तयार केलेल्या प्रकल्पास नाबार्डची मान्यता घेऊन याकरिता कमीत कमी दराचे पुनर्वित्त उपलब्ध करुन देणेबाबत नाबार्डला विनंती करणे.

ठराव क्रमांक ६ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, जिल्ह्यातील किमान ५ एकर कोरडवाहू जमीन धारणा असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या बरीच आहे. व अशा बऱ्याच मोठ्या प्रमाणावरील अल्प भुधारक बँकेचा नियमीत कर्जदार आहे अशा अल्पभुधारक वर्गाची सर्वांगिण आर्थिक उन्नती घडवून आणून बँकेच्या पतपुरवठ्योत व उत्पन्नांत वाढ करण्याचे

हेतूने बँकेने एक योजना तयार केली असून सदर योजनेअंतर्गत एकाच वेळी कृषी व्यवसायास आवश्यक संपूर्ण कर्ज पुरवठ्याची तरतुद करण्यांत आली आहे. कर्जापोटी स्थावर मालमत्तेचे गहाणखत व इतर कागदपत्रे सामिल लाभार्थीचे सहयानिशी बँक घेणार आहे.

अशाप्रकारच्या पतपुरवठा बँकेच्या जादा व्याजदराचे स्वनिधीतून न करता नाबार्डचे कमी व्याज दराचे फेर कर्जातून केल्यास बँकेबरोबर यांचा लाभ अल्पभूधारक शेतकऱ्यांना सुध्दा मिळू शकेल. यादृष्टीने सदर प्रकल्पास खालिल बाबींचे मंजूरीकरिता नाबार्डला विनंती करावी लागेल.

१. एकूण प्रकल्प खर्च (प्रती युनिट) रू.२.३८ लाखास तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या मंजूरी मिळणेबाबत..
२. प्रकल्पांतर्गत ९०टक्के नाबार्डकडून थेट जील्हा बँकेस फेरकर्ज मिळणे बाबत
३. प्रकल्पांतर्गत ९०टक्के नाबार्डकडून थेट जिल्हा बँकेस व पर्यायाने लाभार्थीस व्यवयाच्या फेर कर्ज पुरवठ्यावर कमाल कमी व्याज दराने आकारणी करण्याबाबत..
४. एकूण फेर कर्जावर ५०टक्के दराने शासनाकडून अनुदान मिळून देण्याबाबत..

## -प्रकल्पाचा तपशिल-

१. प्रकल्पांतर्गत गुंतवणूक -

| अ.क्र. | कर्ज तारण | उद्देश | प्रकल्पखर्च युनिट कॉस्ट प्रकल्पखर्च १००% | स्वगुंतवणूक १०% | बँककर्जमर्यादा ९०% |
|---|---|---|---|---|---|
| १. | विहिर | शेती सिंचन | ५०००० | ५००० | ४५००० |
| २.(१) | मोनोब्लॉक इले. मोटर पंपसेट साहित्यासह | सिंचनउपसा | ३०००० | ३००० | २७००० |
| (२) | टर्झरी पाइपलाईन | सिंचन वितरण | | | |
| (३) | बैलजोडी | शेतवाही | | | |
| ३. | शेतघर गोठ्यासह | निवारा/साठवणूक | ८०००० | ८००० | ७२००० |
| ४. | दोन संकरीत गाई | पुरक उद्योग | २८००० | २८०० | २५२०० |
| ५. | शेतीचे कुंपन | संरक्षण | ५०००० | ५००० | ४५००० |
| | | एकुण | २३८००० | २३८०० | २१४२०० |

२. कर्ज परतफेड कालावधी - एकूण १५ वर्षे,
एक वर्षाचे योजना उभारणी
सवलतीचे कालावधीसह
१४ समान व्याजासह वार्षिक हप्त्यांत.

३. कर्जविरील व्याज दर :-

| अ.नं. | कर्ज गट | व्याज दर बँक ते संस्था | द.सा.द.शे. संस्था ते सभासद |
| --- | --- | --- | --- |
| १. | रु.२५०००/- पर्यंत | ११.५० | १२.५० |
| २. | रु.२५०००/- ते रु.२.०० लाख पर्यंत | ११.५० | १४.०० |
| ३. | रु.२.०० लाखाचे वर | ११.५० | १५.५० |

४. योजना उभारणी कालावधीतील संकलीत देय व्याज -
   १. बँक ते संस्था ---- रु.२४६३३-००
   २. संस्था ते कर्जदार --- रु.३३२०१-००

५. व्याजासह वार्षिक कर्ज हप्ता -
   १. बँक ते संस्था ------- रु.३१२१४.००
   २. संस्था ते सभासद -- रु.३८२१७.००

६. सिंचन क्षेत्र - ------- ५ एकर
७. प्रकल्प खर्च- प्रती एकरी बोझा --- रु.४७६००.००
८. प्रति एकरी गुंतवणूक बोझा ---- रु. ४७६०.००
९. प्रति एकरी बँक कर्जमर्यादा बोझा -- रु.४२८४०.००
१०. प्रकल्पापूर्वीचे कोरडवाहू निव्वळ उत्पन्न रु.१५००.००
११. प्रकल्पानंतर ओलीताचे उत्पन्न --- रु.१०२८००.००
१२. वाढीव उत्पन्न - --------- रु.१०१३००.००
१३. खेळते भांडवल ----------- रु.३१९५४.००
१४. व्याजासह वार्षिक कर्जहप्ता ---- रु. ३८२१४.००
१५. निव्वळ वाढीव उत्पन्न ---- रु. ३२५४९.००
१६. बेनीफिट कॉस्ट रेशो ------- - १:०५
१७. आय.आर.आर. - -------- २८.६१

विषयावर सविस्तर चर्चा होउन सभासद स्तरावरील सर्वकष व्याज दर १२% करण्यांत यावा व त्याप्रमाणे प्रस्तावांत दुरुस्ती घेऊन दुरुस्तीसह हे प्रकरण नाबार्डकडे मंजूरीकरिता पाठविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २० :- महाराष्ट्र राज्य सह० बँकेच्या सन १९९६-९७ वर्षाचे तपासणीसंबंधी प्राप्त झालेल्या अहवालावरील पूर्तता अहवालास मान्यता देणे.

ठराव क्रमांक २० :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अधिकाऱ्यांनी बँकेची

सन ९६-९७ या वर्षाकरिता तसेच ९७-९८ या वर्षाकरिता तपासणी करून सादर केलेले अहवालाची दोष पुर्तता करून दिनांक २४/३/२००० रोजीचे मा. अंकेक्षण व पुर्तता उपसमितीचे सभेत तपासणी पूर्तता अहवाल मंजूरीसाठी ठेवण्यात आला. सदर पूर्तता अहवालावर सविस्तर चर्चा करण्यांत येवून सदर पुर्तता अहवालास मा. अंकेक्षण व पुर्तता उपसमितीने त्यास मंजूरी दिलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे सन ९६-९७ व ९७-९८ या वर्षाचे तपासणीवरील कार्यालयाने तयार केलेल्या पूर्तता अहवालास मंजूरी देण्यात आली. तसेच सदर पूर्तता अहवाल महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व संबंधिताकडे त्वरित पाठविण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ११ — बँकेच्या नियोजीत संकुलाचे बांधकाम करणेबाबत आर्कीटेक्ट यांचेकडून एस्टीमेट तयार करणे, टेन्डर मागविणे इत्यादिबाबत पुढील रुपरेषा ठरविणे.

ठराव क्रमांक ११ :— मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेने जुने हिस्लॉप कॉलेजची इमारत खुल्या जागेसह दि. २७/७/१९८२ ला खरेदी केली असून ही इमारत जीर्ण झालेली आहे. या जागेवर नविन इमारत बांधण्याचे दृष्टीकोनातून दिनांक २८/५/१९९५च्या मा. संचालक मंडळाचे सभेत निर्णय घेण्यांत आला. व त्यानुसार नकाशे आणि आवश्यक कागदपत्रे आर्कीटेक्ट कडून तयार करण्यांत येवून मंजूरीकरीता मा. सहकार आयुक्त व निबंधक, सह. संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचेकडे पाठविण्यांत आले. त्याचप्रमाणे महानगरपालीका, नागपूर यांचेकडे सदर नकाशे पाठविण्यांत येवून त्यास मंजूरी सुध्दा प्राप्त झाली होती. परंतु मंजूरीनंतर दोन वर्षात बांधकाम पूर्ण करावयाचे असल्याने आणि मा. सहकार आयुक्त व निबंधक, सह. संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचेकडून मंजूरी न मिळाल्याने सदर बांधकाम होऊ शकले नाही त्यानंतर पुन्हा मा. संचालक मंडळाने याबाबत निर्णय घेउन बँकेचे संकुलाचा प्रस्ताव मा. सहकार आयुक्त, सह. संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचेकडे मंजूरीकरीता पाठविला व दिनांक १४/१/९९ रोजी सदर बांधकामास मंजूरी प्राप्त झाली. त्यानुसार सुधारील नविन नकाशे तयार करून पुन्हा मंजूरीकरिता नागपूर महानगरपालीकेकडे पाठविण्यांत आले. त्या नकाशांना मंजूरी प्राप्त होउन अंदाजे ७५०००/- चौ. फुट

जादा बांधकामास मंजूरी दिलेली आहे. जूनी इमारत पाडण्याकरिता बँकेने वर्तमान पत्रांत जाहिरात देऊन कंत्राटदाराकडून टेंडर मागविले आहे आहे.

दिनांक १/४/२००० रोजी मा. मुख्यमंत्री यांचे शुभहस्ते संकुलाचे भूमी-पूजनाचा समारंभ पार पडला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या परवानगी व आदेशानुसार बँकेच्या नियोजीत महाल येथील संकुलाचे बांधकाम करण्याबाबतचे पूर्ण अधिकार मा. इमारत बांधकाम उप देखरेख व बांधकाम समितिला देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ९२ :- नुकत्याच जाहिर झालेल्या केंद्र सरकारचे बजेटमध्ये खता वरील सबसीडी कमी केल्यामुळे खताच्या किंमतीत झालेली दरवाढ विचारांत घेऊन पीक कर्जदरांत पुनश्च ५% ने वाढ करून मिळणेबाबत राज्य सहकारी बँकेला विनंती करणे.

ठराव क्रमांक ९२ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक १ एप्रिल २००० पासून खरीप कर्ज वाटपास सुरुवात होत आहे. राज्य बँकेने हंगाम २०००-२००१ चे पीक कर्ज दर मंजूर करून पाठविले आहे. व त्याप्रमाणे संबंधितांना पीक कर्जदराबाबत कळविण्यांत आले आहे. परंतु केंद्र शासनाने खतावरील सबसीडी काढून टाकल्याने खताच्या किंमतीमध्ये साधारणत: १५% ने वाढ झालेली आहे. सद्याचे बाजारभाव पाहता बियाणे खते व मजुरीत भरमसाठ वाढ झाल्याने राज्य बँकेने मंजूर केलेले दर कमी पडतात. याबाबत विचार करणे जरूरीचे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन केंद्र सरकारच्या बजेटमध्ये खतावरील सबसीडी कमी होऊन खताच्या किंमतीत झालेली दरवाढ विचारांत घेता पीक कर्जदरांत पुनश्च १०% वाढ करण्यांत यावी, व प्रस्ताव मान्यतेसाठी ठरावासह राज्य सहकारी बँकेला पाठविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ९३ :- मा. संचालकांचा दैनिक भत्ता, सभा (बैठक) भत्ता वाढविणेबाबत महाराष्ट्र कोऑप. सोसा. रूल्स १९६१ चे रूल नं. ७०७३ मध्ये दुरुस्ती करण्याचे संदर्भात महाराष्ट्र शासनाकडे विनंती करणे.

ठराव क्रमांक ९३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती

देतांना सांगितले की, महाराष्ट्र को.ऑप.सोसा. रुल्स १९६१ मधील नियम १०७(अ) चे तरतुदीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे संचालकाकरिता दैनिक भत्ता व सभा (बैठक) भत्ता याची कमाल मर्यादा निश्चित केली आहे. सदर कमाल मर्यादेचे दर सन १९९२ साली सुधारीत करण्यांत आले तेंव्हा-पासून त्यांत वाढ करण्यांत आली नाही. सद्या पेट्रोल, डिझेल, लॉजींग, बोर्डींग इत्यादि खर्चाचे दरांत मोठ्या प्रमाणांत वाढ झालेली आहे. संस्थेचे, बँकेचे सभांना उपस्थित राहण्यासाठी अगर संस्थेचे कामकाजानिमित्त संचालकांना प्रवास करावा लागल्यास त्यांना बाहेरगांव मुंबई, पुणे इत्यादि ठिकाणी जावे लागल्यास लॉजींग बोर्डींग व तदनुषंगिक खर्चाप्रित्यर्थ त्यांना होणारा खर्च भरपाई होणे आवश्यक आहे. त्याकरिता सद्याचे दैनिक भत्ता, बैठक भत्यांचे दरामध्ये वाढ करणे जरूरीचे झालेले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे मा.संचालकांना प्रत्येक सभेसाठी रुपये ५००/- सभा (बैठक) भत्ता देण्यांत यावा तसेच दैनिक भत्ता सुध्दा खालीलप्रमाणे वाढविण्याबाबत महाराष्ट्र को.ऑप.सोसा. रुल्स १९६१ चे कलम १०७(अ) मध्ये दुरुस्ती करणेसाठी ठरावासह प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यांत यावा असे ठरले.

| | | सद्याचा दर | सुधारीत दर |
|---|---|---|---|
| (१) दैनिक भत्ता — | | | |
| | (अ) सर्वसाधारण दैनिक भत्ता | रुपये ५०.०० | रुपये १००.०० |
| | (ब) मुंबई येथील दैनिक भत्ता | रुपये १००.०० | रुपये २००.०० |
| | (क) मुंबई खेरिज इतर महानगरपालीकेचे ठिकाणी | रुपये ७५.०० | रुपये १५०.०० |
| | (ड) दिल्ली येथील दैनिक भत्ता | रुपये १२०.०० | रुपये २४०.०० |
| (२) सभा (बैठक) भत्ता - | | | |
| | बँकेच्या प्रत्येक सभेकरिता | रुपये १२५.०० | रुपये ५००.०० |

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १८:- दि अकोला अर्बन कोऑपरेटीव्ह बँक लि., अकोला येथे रुपये ८.०० कोटीची गुंतवणुक करण्यास घेण्यांत आलेल्या सर्क्युलर ठरावास मान्यता देणे.

ठराव क्रमांक १८:- मा.अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दि अकोला अर्बन कोऑपरेटीव्ह बँक लि. अकोला यांनी त्यांचे पत्रा प्रमाणे रुपये ८.०० कोटी रक्कम त्यांचे बँकेत ठेव ठेवण्यास विनंती केली आहे. त्यांचेकडे ६० दिवसाकरिता ठेव दिल्यास १४% व्याज देण्याचे त्यांनी

कळविले आहे. इतर ठिकाणापेक्षा हा व्याजदर जास्त असल्याने या बँकेत ६० दिवसाकरिता १४% व्याजदराप्रमाणे रूपये ४.०० कोटी गुंतवणूक करण्यास खालील प्रमाणे दिनांक १८।३।२००० ला सर्क्युलर ठराव करण्यांत आला व त्यानुसार दि. अकोला अर्बन कोऑपरेटीव्ह बँकेत रूपये ४.०० कोटीची गुंतवणूक करण्यांत आलेली आहे. तरी याबाबतच्या सर्क्युलेटिंग ठरावास मान्यता देण्यांत यावी.

- सर्क्युलर ठराव -

“दि अकोला अर्बन कोऑपरेटिव्ह बँक लिमी., अकोला यांनी त्यांचेकडे रूपये ४.०० कोटीची ठेव ठेवण्याकरिता विनंती केली आहे. या ठेवीवर ६० दिवसांकरिता १४% दराने व्याज देण्याचेही त्यांनी मान्य केले आहे. इतर कोणत्याही गुंतवणुकीपेक्षा हा व्याजदर जास्त असल्याने दि अकोला अर्बन कोऑपरेटिव्ह बँक लि., अकोला बँकेस रूपये ४.०० कोटी गुंतविण्यास मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे सदर ठेव ठेवण्यास परवानगी देण्याची विनंती करण्यांत यावी.”

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दि अकोला अर्बन कोऑपरेटिव्ह बँक लि., अकोला येथे ६० दिवसाकरिता १४% व्याजदरा प्रमाणे रूपये ४.०० कोटीची गुंतवणुक करण्यास घेण्यांत आलेल्या दिनांक १८।३।२००० चे सर्क्युलेटींग ठरावास मान्यता देण्यांत आली. व मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे सदर ठेव ठेवण्यास परवानगी देण्याची विनंती करण्यांत यावी असे ठरले.”

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १५ :- बँकेच्या उपविधीत बदल व विस्तार करणेबाबत..

ठराव क्रमांक १५ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे उपविधी पान नंबर ५ वरील उपविधी क्र. ९(५) व ९(६) तसेच पान क्रमांक २६ वरील उपविधी क्रमांक ५३(२) मध्ये बदल व विस्तार करावयाचा असून उपविधी क्रमांक ९(७) व ९(८) हे नविन घालावयाचे आहेत. उपविधी मध्ये तरतुद करण्याबाबतचे परिशिष्ट सोबत जोडले आहे.

| Bye law No. | Wording of Existing Bye law | Amendment proposed | Wording of the Bye law after Amendment | Reason for Amendment. |
|---|---|---|---|---|
| 9(vii) Page No.6 | | (Newly Added) The nominal membership | The nominal membership may be allotted to the persons, | The provisions has been made for deploying the |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | may be alloted to the person, partnership, firms, Companies, Corporation, Local Bodies, Educational Institutions, A.P.M.C. & Trusts etc. as per the provisions of Maharastra Cooperative Societies Act. 1960. | Partnership firms, Companies, Corporations Local Bodies Educational Institutions, A.P.M.C. and Trusts etc. as per the provisions of Maharastra Cooperative Societies Act. 1960. | the surplus fund profitably by increasing the high yielding non farm sector finance. However, it is needless to say that the priority will be given to the Agricultural finance. |
| 9(viii) page No. 6 | | (Newly Added) (Addition in Byelaws) The nominal membership may be alloted to the Cooperative societies and other Institutions having a jurisdiction out of District participating in the consortium finance with the Maharastra state Cooperative Bank or/and with any other Bank. | The nominal membership may be alloted to the Cooperative societies and other Institutions having a jurisdiction out of District participating in the consortium finance with Maharastra state Cooperative Bank or/and with any other Bank. | The provision has been made for utilisation of surplus in the diversified and high yielding non farm sector. |
| 53(ii) page No. 26 | A loan to an individual members including group of individuals partnership or proprietory firm and Cooperative Enterprises shall not exceed Rs. 10,00,000/- except in the case of loans against the security of fixed deposits. | The loan may be Advanced as per the directions issued by the NABARD's from time to time to an individual members including group of individual, Partnership ~~or~~ proprietory firms, companies, Corporation Local Bodies, APMC, Educational Institutions Trusts and Cooperative Enterprise against the securities. | The loan may be Advanced as per the directions issued by the NABARD' from time to time to an individual members including group of Individul Partnership or proprietory Firms, companies, Corporation, Local Bodies, A.P.M.C., Educational Institutions, Trusts and Cooperative Enterprises against the securities. | To deploy the surplus funds profitably in the high ~~yied~~ yielding non farm sector. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9(v) Page No. 5 | Members of primary societies other than Urban Banks and sale purchase Socs. requiring finance against agricultural produce, valuable or Govt. and Trustee, Securities may be admitted as nominal members of the Bank. Persons holding Fixed Deposit receipts, Ware house receipts, Rural Debentures, National Defence Certificate, National Plan Certificate or Defence Deposit Certificates may whether or not they are members of any Cooperative Societies, be admitted as nominal members before any advance is made to them against such securities as per rules framed by the Bank in this behalf. | Add — National Saving Certificates and overdraft on Saving A/C. and Loan to a person for a purpose of small Road Transport. | Members of primary societies other than Urban Banks and sale Purchase Socs. requiring finance against agricultural produce, valuables or Govt. and Trustee securities may be admitted as nominal members of the Bank. Persons holding Fixed Deposit Receipts, Warehouse Receipts, Rural Debentures, National Defence certificates, National plan Certificates or Defence Deposit Certificates, National Saving Certificates, L.I.C. and overdraft on saving Account and loan to a person for the purpose of small Road Transport may whether or not they are members of any Cooperative Socs. be admitted as nominal members before any advance is made to them against such securities as per rules framed by the bank in this behalf. | To increase the scope of the loan sector & to increase the profit margin of the bank. |
| 9(vi) Page No 6 | Persons admitted as nominal members shall not be required to hold shares but shall have to pay a non refundable entrance fee of Rs.2/-. They shall have no right to vote or to participate in the management of the Bank or in the distribution of profits. They shall incur no liabilities in the event of winding up of the bank. | Instead of the word 'entrance' the word is nominal member & instead of the word Rs.2/- the word is Rs.10/- | Persons admitted as nominal members shall not be requires to hold shares but shall have to pay a non refundable nominal member fee of Rs.10/-. They shall have no right to vote or to participate in the management of the Bank. or in the distribution of profit. They shall incur no liabilities in the event of winding up of the bank. | The nominal membership fee is increased up to Rs.10/- as the previous membership fees was very less. |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन वर दर्शविल्याप्रमाणे उपविधी दुरुस्तीला मान्यता देण्यांत आली. तसेच हाऊसींगकारिता कर्जवाटप करण्याबाबत सुद्धा उपविधीत तरतुद करावी व संपूर्ण प्रस्ताव दुरुस्तीसह मान्यतेसाठी सर्व वार्षिक साधारण सभे पुढे ठेवावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १६ :- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक १६(१) :- महाराष्ट्र सहकारी कायदा कलम ४३, नियम ३५ नुसार असलेली बाहेरील कर्ज उभारणी मर्यादा २५ पटीवरून ३५ पटीपर्यंत दिनांक ३०।६।२००१ पर्यंत वाढवून मिळण्याबाबत मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक १६(१) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ४३ नियम ३५ अन्वये भाग भांडवल + बचत निधी + इमारत निधी – संचयीत तोटा यांचे बेरजेच्या १२ पट इतकी बँकेची बाहेरील कर्ज उभारण्याची क्षमता ठरते. वाढत्या ठेवीमुळे ही मर्यादा मागील वर्षी मा० जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचे पत्र क्र० १००८६ दिनांक २६।४।१९९९नुसार २५ पट दिनांक ३०।६।२००० पर्यंत मर्यादा वाढवून देण्यांत आली आहे.

सद्याचे परिस्थितीत मागील आणि आताची तुलनात्मक आंकडेवारी खाली दिलेली आहे.

(आंकडे लाखांत)

| | दिनांक २६।३।१९९९ | दिनांक २५।१२।२००० |
|---|---|---|
| १.) भाग भांडवल ............ | ८७३.८५ | ९७८.१५ |
| २.) रिझर्व्ह फंड ............ | २००.४६ | २२८.०८ |
| ३.) इमारत फंड ............ | १६६.०९ | १६२.०९ |
| | १२४०.४० | १३६८.३२ |
| (–) वजा तोटा | — | — |
| १२ पटीप्रमाणे येणारी मर्यादा | १४८८४.८० | १६४१९.८४ |
| २५ पटीप्रमाणे येणारी मर्यादा | ३१०१०.०० | ३४३५८.०० |
| ३५ पटीप्रमाणे येणारी मर्यादा | ४३४१४.०० | ४७८९१.२० |
| बाहेरील कर्जे — | | |
| १.) ठेवी ............ | २४६२६.६३ | ३४६३०.६४ |
| २.) कर्जे व ओव्हरड्राफ्ट ............ | १३१२.६५ | १६३३.४० |
| | २५९३९.२८ | ३६३६४.०४ |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन वरील परिस्थिती विचारांत घेता १२ पटीपर्यंत कायद्यानुसार असलेली मर्यादा आणि २५ पटीपर्यंत दिनांक ३०।६।२००० पर्यंत मंजूरी मिळालेली मर्यादा या दोन्ही मर्यादा अपुऱ्या पडत असल्याने बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा पुढील दिनांक

३०।१।२००१ पर्यंत भाग भांडवल + बचत निधी + इमारत निधी (वजा) तोटा ह्यांचे अपर्याप्तपर्यंत ठेवण्याची परवानगी देण्याबाबत मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना ठरावासह विनंती करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १६(२) :- बँकेनी तसेच बँकेविरुध्द दाखल करण्यांत येणाऱ्या कोर्टकेसेस मध्ये शपथ पत्र तसेच साक्ष देण्याचे अधिकार संबंधीत मुख्याधिकारी ह्यांना प्रदान करणेबाबत...

ठराव क्रमांक १६(२) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेनी तसेच बँकेविरुध्द दाखल करण्यांत आलेल्या कोर्ट केसेसमध्ये शपथ पत्र तसेच साक्ष देण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. यावर मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, असे अधिकार मुख्याधिकारी स्तरावर देण्यांत आल्यास कामात सुसुत्रता निर्माण होउन मा० सरव्यवस्थापक व मा० व्यवस्थापक यांचेवरील कामाचा भार कमी होईल. यावर सविस्तर चर्चा होउन याबाबत कायदेशिर तज्ञाचे मत मागवून निर्णय घेण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १६(३) :- मोहता हैड्रोक्विप प्रा० लिमि० सितावर्डी नागपूर यांना प्रेशर होसपाईप तयार करण्याचे उद्योगासाठी सदर प्रकल्प अहवालानुसार खेळते भांडवली कर्ज मर्यादा रु. ३५.०० लाख मंजूर करणेबाबत व सादर केलेला प्रकल्प अहवाल पुढील मान्यतेस राज्य सहकारी बँकेमार्फत नाबार्डकडे पाठविण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १६(३) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मोहता हैड्रोक्विप प्रा० लि० सितावर्डी, नागपूर ही कंपनी जड माइनिंग मशिनरीकरिता आवश्यक असलेल्या वेगवेगळ्या क्षमतेच्या प्रेशर होसपाईपचे उत्पादन करीत असून, उत्पादनाच्या लघु उद्योग प्लॉट नंबर डब्ल्यु ३४, एम.आय.डी.सी. हिंगणा येथे आहे. कंपनीचा सदर उद्योग १९८८ पासून सुरु असून कंपनी वेस्टर्न कोल फिल्डचे कार्यक्षेत्रांत उत्पादनाचा नियमित पुरवठा करीत आहे.

वरील उद्योगाशिवाय जपानचे सनमी कारपोरेशन यांच्या हॉटलाईन क्युरीफायर माइनिंगचे भारतातील एकमेव एजंट म्हणून सदर कंपनी काम करीत आहे. या माइनिंगचा पुरवठा एम.एस.ई.बी. टाटा इलेक्ट्रिकल्स, एस.ई.सी.एल. इत्यादिना सध्या सुरु आहे. कंपनीने सादर केलेल्या प्रकल्प

प्रकल्प अहवाल व अर्थिक पत्रकावरुन मागील वर्षाची आर्थिक उलाढाल रुपये ६५.४३ लाख असून वर नमुद केलेल्या एजन्सीमुळे आर्थिक उलाढालीमध्ये वाढ होण्यास भरपूर वाव आहे. कर्ज सुरक्षिततेच्या दृष्टीने कंपनीने स्वतःची मालमत्ता तारणात देण्याबाबत संमती दिलेली असून, त्यांचे वर्णन व किंमत खालीलप्रमाणे आहे.

| संपत्तीचा तपशिल | संपत्तीचे मुल्य |
|---|---|
| १. एम.आय.डी.सी. नागपूर येथील कंपनीचा प्लॉट नं. डब्ल्यु.३४ व त्यावरील बांधकाम | रु. ८.५० लाख |
| २. उपरोक्त फॅक्टरीमधील असलेली मशिनरी | रु. २५.१५ लाख. |
| ३. व्यंकटेश मार्केट, मेनरोड, सीताबर्डी येथील कंपनीचे ब्लॉक क्रं. २०१, २०२ व २०५. | रु. १२.३७ लाख. |
| | एकुण रु. ४६.०२ लाख |

वरील मालमत्तेचा सर्व बँकेच्या पॅनेलवरील वकिल यांनी घेतलेला असून, त्यांनी दिलेल्या अहवालाप्रमाणे एम आयडीसी, हिंगणा येथील मालमत्ता ही स्टेट बँक ऑफ इंडिया, हिंगणा इंडस्ट्रीयल इस्टेट यांचेकडे खालील मर्यादेपोटी गहाण आहे.

| | |
|---|---|
| १. कॅश क्रेडीट कर्ज मर्यादा | रुपये ६.०० लाख |
| २. डि. डि. पर्चेस मर्यादा | रुपये २.०० लाख |
| ३. बँक गॅरंटी मर्यादा | रुपये ५.०० लाख |
| | एकुण रुपये १३.०० लाख |

कंपनीच्या वाढता व्यवसाय विचारांत घेता कंपनीला अधिकची कर्ज मर्यादा आवश्यक असल्याने स्टेट बँकेकडून कर्ज खाते बंद करुन आपल्या बँकेकडून कर्ज व्यवहार करण्याची कंपनीची इच्छा असल्याने कंपनीने बँकेकडे कर्जमर्यादा मंजुरीची मागणी केलेली आहे.

बँकेच्या पॅनेलवरील चार्टर्ड अकाउंटंट श्री पी.एस.ठाकरे यांनी कंपनीचे कर्ज प्रकरणाची छाननी करुन दिलेल्या अहवालानुसार सदर प्रकरण तांत्रिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याचे कळवून कंपनीला वेगवेगळ्या कारणासाठी कर्ज मर्यादा मंजूर न करता फक्त कॅश क्रेडीट कर्ज मर्यादा रु.३५.०० लाख मंजूर करण्याबाबत अभिप्राय दिलेला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या पॅनेलवरील आर्किटेक्ट यांनी वरील मालमत्तेचा सादर केलेला मुल्यांकन अहवाल तसेच

प्लॉट व मशिनरीचे मुल्यांकन या सर्व बाबी एकूण रूपये ४६.०२ लाख विचारांत घेता कंपनीचे प्रकल्प अहवालास मंजूरी देऊन कंपनीला खेळते भांडवलासाठी रु.३०.०० लाख कॅश क्रेडिट मर्यादा दिनांक ३१।३।२००१ पर्यंतचे मुदतीसाठी कर्जनिधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यांत आली. तसेच प्रकल्प अहवाल नाबार्डचे मान्यतेसाठी राज्य सहकारी बँकेमार्फत पाठवावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १९(४):- बचत ठेव व चालु ठेव खात्यावर कमीत कमी बाकी ठेवण्याच्या नियमांत करण्यांत येणाऱ्या बदलाबाबत..

ठराव क्रमांक १९(४):- मा०अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत सध्याच्या नियमानुसार बचत ठेव खाते उघडतांना व त्यानंतर सतत कमीत कमी रुपये १००/- बाकी असावी. तसेच बचत ठेव खात्यावरील चेक बुक धारकास रुपये २००/- कमीत कमी बाकी असावी. चालु ठेव खात्यावर कमीत कमी रुपये ५००/- बाकी असावी असे मा०संचालक मंडळाचे दि० १६।५।१९९९चे सभेत ठरविण्यांत आले.

इतर सहकारी बँका व कमर्शियल बँकांत खालीलप्रमाणे बाकी ठेवण्यांत येते.

| अ.क्र. | बँकेचे नांव | बचत ठेव खाते बिना चेकबुक | बचत ठेव खाते चेकबुकासह | चालु ठेव खाते |
|---|---|---|---|---|
| १. | शिक्षक सहकारी बँक | १००.०० | ५००.०० | १०००.०० |
| २. | नागपूर नागरीक सहकारी बँक | ५०.०० | ५००.०० | १०००.०० |
| ३. | स्टेट बँक ऑफ त्रावणकोर | २०.०० | ३००.०० | ३५००.०० |
| ४. | यु.को. बँक | २५०.०० | ५००.०० | ५०००.०० |
| ५. | सिंडीकेट बँक | २५०.०० | ५००.०० | ३०००.०० |
| ६. | अकोला अर्बन कोऑप. बँक | २००.०० | ५००.०० | १०००.०० |
| ७. | नागपूर जिल्हा मध्य. सहकारी बँक म. | १००.०० | ३००.०० | ५००.०० |

विषयावर सविस्तर चर्चा होऊन इतर बँकांतील परिस्थितीचा विचार करता कमीत कमी बाकी ठेवण्याचे संदर्भात खालीलप्रमाणे बदल करण्यांत यावा असे ठरले.

| बचत ठेव खाते बिना चेक बुक | बचत ठेव खाते चेक बुक सह | चालू ठेव खाते. |
|---|---|---|
| रु. १००/- | रु.५००/- | रु.१०००/- |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषयक्रमांक १९(५) :- सन १९९९-२००० करिता कर्ज नुतणीकरण मंजूर झालेल्या हातमाग विणकर सहकारी संस्थांचे माहितीबाबत..

ठराव क्रमांक १९(५) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले.व सन १९९९-२००० करिता बँकेनी नुतनीकरण मंजूर केलेल्या हातमाग विणकर सहकारी संस्थांची माहिती सभेला दिली. या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक १९(६) :- हॉटेल दर्शन टॉवरचे आधुनिकीकरण व नुतनीकरणासाठी मुदती कर्ज रुपये ४६.५० लाख व खेळते भांडवलासाठी कॅश क्रेडिट कर्ज मर्यादा रुपये १०.०० लाख कर्ज निधी उपलब्ध करुन देणेचे प्रकल्प अहवालास मंजूरी देणे व सदर प्रकल्प अहवाल नाबार्ड कडे मान्यतेसाठी पाठविणेबाबत.

ठराव क्रमांक १९(६) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सेंट्रल एव्हेन्यु रोड, गांधीबाग, नागपूर येथील हॉटेल दर्शन टॉवरचे आधुनिकीकरण व नुतनीकरण करणेसाठी शाखा गांधीबाग मार्फत आवश्यक कागदपत्रासह प्रकल्प अहवाल प्राप्त झाला असून सदर हॉटेल मे. दर्शनसिंह अँन्ड सन्स या भागीदारी कंपनीमार्फत चालू आहे. कंपनीचे (१) श्री महेंद्रपालसिंग दर्शनसिंग लुली व (२) श्री परमजीतसिंग दर्शनसिंग लुली असे दोन भागीदार आहेत.

सादर केलेल्या प्रकल्प अहवालानुसार सदर हॉटेलची उभारणी रुपये १९४.०० लाखाचे गुंतवणुकीवर झाली असून यापूर्वी बँक ऑफ इंडिया, शाखा प्रतापनगर, यांचेकडून घेतलेल्या कर्जापैकी रुपये १५.४५ लाख देणेबाकी आहे. बँक ऑफ इंडियाला परत करावयाच्या रुपये १५.४५ लाख रकमेचा समावेश प्रकल्प खर्चामध्ये केलेला आहे.

सादर केलेल्या प्रकल्प अहवालानुसार हॉटेलचे आधुनिकीकरण व नुतनीकरण करण्यासाठी रुपये ६२.४८ लाखाचा प्रकल्प अहवाल तयार केला असून त्यानुसार बँकेकडून रुपये ४६.५० लाख मुदती कर्ज (यामध्ये बँक ऑफ इंडियाचे कर्ज परतफेडीचा समावेश आहे) व खेळते भांडवलाकरिता रुपये १०.०० लाख कॅश क्रेडिट कर्ज मर्यादेची मागणी केली आहे. सदर हॉटेल चालविण्यासाठी आवश्यक परवाने / परवानगी प्रकरणासोबत सादर केलेला असून सद्यास्थितील मागील ३ वर्षाचा आढावा घेतला असता रेस्टॉरेंट बार कॉन्फरन्स हॉल व रुम भाडे पासून एकुण सरासरी उत्पन्न रुपये ८८.१५ लाख प्रति वर्षाला आहे. प्रकल्प अहवालांत कर्जावरील व्याजदर द.सा.द.शे. १६% दर्शविला असून कर्ज परतफेड ९ वर्ष सवलतीचा काळ विचारांत घेऊन

रक्कम दर तिमाही हप्त्यांत भरणार आहे. सदर प्रकल्पाची छाननी बँकेचे पॅनेलवरील चार्टर्ड अकाउंटंट यांनी केलेले असून प्रकल्प अहवाल तांत्रिक दृष्ट्या सक्षम व आर्थिकदृष्ट्या अर्थक्षम असल्याचे नमुद करून भागीदारी फर्मला हॉटेल चालविण्यासाठी तसेच बँक ऑफ इंडियाचे कर्जाची परतफेड करण्यासाठी मुदती कर्ज रु. ४६.५० लाख तसेच खेळते भांडवलासाठी रुपये १०.०० लाख कॅश क्रेडीट मर्यादा खालील अटीवर मंजूर करण्याबाबत अभिप्राय दिला आहे. तसेच कॅश क्रेडीट कर्जमर्यादा उपलब्ध करून देतांना मालसाठ्याचे तसेच ६ महिन्याचे आंतील उधारी येणे बाकीच्या ४०% मार्जिन राखून कर्ज व्यवहार नियंत्रित करावेत असे नमुद केले आहे.

बँकेचे कर्ज सुरक्षिततेचे दृष्टिकोनातून खालीलप्रमाणे मालमत्ता गहाणांत देत आहे.

(१) श्री परमजितसिंग दर्शनसिंग व सौ. कुलवंत कौर दर्शनसिंग लुली यांची मौजा कापसी (बु.) सर्वे नं. ५५/२ व ५८/१ आराजी अनुक्रमे ०.२५ व ०.७१ अशी एकूण ०.९६ हेक्टर सामुहिक हक्कातील शेत जमिन.

(२) श्री विरेंद्रपालसिंग व महेंद्रपालसिंग यांची मौजा कापसी (बु) सर्वे नं. ५५/१ आराजी ०.९६ हेक्टर सामील हक्कातील शेतजमीन.

वरील संपूर्ण शेतजमीनीची किंमत प्रकरणासोबत सादर केलेल्या श्री परमानंद रामटेके, चार्टर्ड अकाउंटंट यांनी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार सदर जमीन नॅशनल हायवे, भंडारा रोडला लागून असल्यामुळे रु. ७५.७३ लाखाची असल्याचे नमुद केले आहे.

शेत जमीनीचे मुल्यांकन बँकेचे पॅनेलवरील आर्किटेक्ट यांचेकडून करून घेऊन त्यांचे अहवालानुसार शेतजमीनीचे मुल्य विचारांत घेऊन सद्यःस्थितील दर्शन टॉवर हॉटेल कार्यरत असल्यामुळे प्रथम खेळते भांडवलासाठी रु. १०.०० लाख कॅश क्रेडीट मर्यादा उपलब्ध करून देऊन हॉटेलचे आधुनिकीकरण व नुतनीकरण करणेसाठी प्रकल्प अहवालानुसार मागणी केलेले दिर्घमुदती कर्ज रु. ४६.५० लाख बँक ऑफ इंडियाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच उपलब्ध करून देणे योग्य ठरेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन हॉटेल दर्शन टॉवरचे प्रकल्प अहवालास मान्यता देण्यांत आली. व सद्यःस्थितील हॉटेल कार्यरत असल्याने कर्ज प्रकरणांत दर्शविलेली भागीदाराची शेतजमिन कर्ज सुरक्षिततेसाठी बँकेचे गहाणांत घेऊन खेळते भांडवलासाठी रुपये १०.०० लाख कॅश क्रेडीट मर्यादा उपलब्ध करून देण्यास मंजूरी देण्यांत आली.

तसेच प्रकल्प अहवालानुसार हॉटेल दर्शन टॉवरचे आधुनिकीकरण

व नुतणीकरणासाठी रुपये ४६.५० लाख मुदती कर्ज मंजूर करण्यांत आले. हॉटेल दर्शन टॉवरची मालमत्ता बँक ऑफ इंडियाकडे गहाणांत असल्याने बँक ऑफ इंडियाचे कर्जाची परतफेड करणेसाठी मंजूर कर्जामधून उचल देवून बँक ऑफ इंडियाचे "नो ड्युज सर्टीफिकेट" प्राप्त झाल्यानंतर त्यांचे गहाणातील बोझा विरहीत मालमत्ता बँक कर्ज सुरक्षिततेसाठी रजिष्टर गहाण करुन घेवून प्रकल्प अहवालानुसार आधुनिकीकरण व नुतनीकरणाचे कामासाठी उवरित कर्ज निधी उपलब्ध करुन द्यावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५६(७) - आमगांव केमिकल अँड एक्सपोर्टस् (इंडिया) लि. धंतोली नागपूर कंपनीत अल्कोहोल व मिनरल वाटर उत्पादन प्रकल्प उभारणे करिता रु.२२.०० कोटी दिर्घ मुदती कर्ज व रु.२.०० कोटी खेळते भांडवली कर्ज मर्यादा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत व प्रकल्प अहवाल नाबार्ड मान्यतेसाठी पाठविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५६(७) – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती दिली की, आमगांव केमिकल्स अँड एक्सपोर्टस् (इंडिया) लि. या कंपनीने अल्कोहोल व मिनरल वॉटर उत्पादनाकरिता प्रकल्प उभारणीसाठी दिर्घ मुदती कर्ज रुपये २२.०० कोटी व खेळते भांडवली कर्ज मर्यादा रुपये २.०० कोटी असे एकूण रुपये २४.०० कोटी कर्ज निधी उपलब्ध करुन देणेबाबत बँकेकडे आवश्यक कागदपत्रासह प्रकल्प अहवाल शाखा धंतोलीमार्फत सादर केलेला आहे. सदर कंपनीची नोंदणी कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत शेतकरी केमिकल्स अँड एक्सपोर्टस् (इंडिया) लि., या नावाने दिनांक ६-१-१९९७ ला झाली असून कंपनीने दिनांक २५.६.१९९८ ला रजिष्टार ऑफ कंपनीज, महाराष्ट्र, मुंबई यांचे कडून कंपनीचे नांव आमगांव केमीकल्स अँड एक्सपोर्टस (इंडिया) लि., याप्रमाणे नावात बदल करुन प्रमाणपत्र घेतलेले आहे. कंपनीने प्रकल्प अहवालासोबत मेमोरँडम अँड आर्टीकल्स ऑफ असोशियेशन सादर केले आहे.

सदर प्रकल्प मौजा आमगांव, ता० पाराशिवनी, जि. नागपूर येथील सर्वे नंबर २४, ९८ आराजी अनुक्रमे १.४१, १.७१ हेक्टर असे एकूण ३.१२ हेक्टर म्हणजे ८ एकरमध्ये परिसरांत उभारणी होत असून सदर प्रकल्प उभारणीसाठी निगडीत कच्चा माल, पाणी पुरवठा, विद्युत, वाहतुक, दुरसंचार सुविधा, इत्यादि बाबी उपलब्ध असून

प्रकल्प अहवालांत दर्शविल्याप्रमाणे प्रकल्पाची क्षमता अल्कोहोल निर्मिती प्रति दिन २७५०० लिटर व मिनरल वाटर निर्मिती ७५००० लिटर आहे. प्रकल्प अहवाला नुसार प्रकल्प उभारणी खर्च व त्यासाठी कर्ज मागणी खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | खर्चाचा तपशिल | प्रकल्प अहवालानुसार दर्शविलेला खर्च. |
|---|---|---|
| १. | जमिन व विकास खर्च | रु. ४९.०० लाख |
| २. | फॅक्टरी व कार्यालय इमारत बांधकाम | रु. ३५८.०५ लाख |
| ३. | प्लँट अँड मशिनरी | रु. २३३५.०० लाख |
| ४. | इतर फिक्स अॅसेट व डिपॉझिट | रु. १६.९५ लाख |
| ५. | उभारणीपूर्व खर्च | रु. १११.०० लाख |
| ६. | प्रारंभीक खर्च | रु. ६.०० लाख |
| ७. | कॉन्टेनजन्सीज | रु. ६६.०० लाख |
| ८ | खेळते भांडवलासाठी मार्जीन | रु. ६७.०० लाख. |
| | एकुण | रु. २९८८=०० लाख. |

वरिलप्रमाणे प्रकल्प उभारणी खर्च विचारांत घेता कंपनी खालिल प्रमाणे कर्ज उभारणी करील आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रवर्तकाकडून स्वभांडवल | रुपये ७८८.०० लाख |
| २ | बँकेकडून कर्ज निधी | रुपये २२००.०० लाख |
| | एकुण रुपये | २९८८.०० लाख |

वर नमुद केल्याप्रमाणे प्रकल्प अहवालांत दर्शविल्यानुसार प्रकल्प खर्च रुपये २९.८८ कोटी असून प्रकल्प उभारणीसाठी बँकेकडे — रुपये २२.०० कोटीची कर्ज मागणी कंपनीने केली असून प्रकल्प उभारणीनंतर खेळते भांडवलाकरिता रुपये २.०० कोटी कॅश क्रेडीट कर्ज मर्यादेची मागणी केली आहे. प्रकल्प अहवालांत कर्जावरील व्याज दर द.सा.द.शे. १५ टक्के दर्शविलेला असून कर्जाची परतफेड एक वर्ष सवलतीचा काळ विचारांत घेऊन त्यापुढील ७ वर्षात १४ सहामाही हप्त्यांत करणार आहे.

सदर उद्योगाकरिता भारत सरकार, उद्योग मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून दिनांक १८.११.९६ ला अल्कोहोल निर्मितीसाठी प्राप्ती सुचना कंपनीला मिळाली आहे. तसेच राज्य सरकारकडून सदर उद्योगाकरिता आवश्यक परवाने तसेच परवानगी पत्रे यथायोग्य वेळी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कंपनीची राहील असे प्रकल्प अहवालांत नमुद केले आहे. सदर प्रकल्प अहवाल बँकेचे पॅनेलवरील चार्टर्ड अकौंटंट श्री. पी. एस. ठाकरे यांचेकडून तपासणी करून घेण्यांत आली असून

यांचे अहवालानुसार सदर प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या सक्षम व आर्थिकदृष्ट्या अर्थक्षम असल्याचे अभिप्राय दिला असून सदर प्रकल्प उभारणीसाठी रुपये २२.०० कोटी दिर्घ मुदती कर्ज व रुपये २.०० कोटी खेळते भांडवली कर्ज निधी उपलब्ध करुन देण्याची शिफारस केली आहे.

बँकेचे कर्ज सुरक्षिततेसाठी निर्माण होणारी कंपनीची मालमत्ता बँकेला गहाण करुन देणार आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन आमगांव केमिकल्स अँड एक्सपोर्टस (इंडिया) लि. धंतोली, नागपूर या कंपनीला 'अल्कोहोल व मिनरल वॉटर प्रकल्प उभारणीसाठी रुपये २२.०० कोटी व प्रकल्प उभारणीनंतर खेळते भांडवलासाठी रुपये २.०० कोटी कॅश क्रेडिट कर्ज मर्यादा असे एकूण रुपये २४.०० कोटी कर्ज निधी उपलब्ध करुन देण्यास मंजूरी देण्यांत आली. सदर प्रकल्प अहवाल राज्य सहकारी बँकेमार्फत नाबार्डकडे मान्यतेसाठी पाठविण्यांत यावे. नाबार्डच्या अटी, शर्ती बँकेला मान्य राहतील असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १६ (८) - ट्रॅक्टर कर्जावरील राज्य बँकेला रिफायनान्स व्याजदर कमी करण्याकरिता विनंती करण्याबाबत.

ठराव क्रमांक १६ (८) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, ट्रॅक्टरच्या युनिटच्या किंमतीमध्ये भरमसाठ वाढ झाल्यामुळे त्याप्रमाणांत द्यावयाच्या कर्ज रकमेतही वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे त्यावरील व्याजाचा दर साधारणतः १६ ते १७ टक्के विचारांत घेता शेतकऱ्यांना परतफेड करावयाच्या मुद्दल हप्त्याच्या रकमेइतकाच व्याजाचा सुध्दा हप्ता येतो. एवढ्या मोठ्या रकमेचा कर्ज हप्ता शेतकऱ्यांना मुदतीच्या आंत परतफेड करणे कठीण जात असल्यामुळे ट्रॅक्टर कर्ज थकबाकीचे प्रमाण वाढत आहे. याशिवाय कर्ज वाटपांत लक्षणीय वाढ झाल्याने बँकेला अतिरिक्त निधीची गुंतवणूक करावी लागत आहे. निधीची ही गरज लक्षांत घेता राज्य बँक व नाबार्ड यांचेकडून रिफायनान्स झाल्यास जिल्हा बँकेच्या निधीवर पडणारा ताण कमी होईल.

ही बाब विचारांत घेऊन ट्रॅक्टर कर्ज पुरवठ्यांतर्गत रुपये २.०० लाखाचे वरील कर्जावर आकारण्यांत येणारा सध्याचा राज्य सह बँकेचा फेर कर्जाचा दर १३.५% हा जास्त असल्याने तो निम्म्यापर्यंत

कमी करण्याबाबत राज्य बँक व नाबार्डला विनंती करण्यांत यावी असे ठरले. तसेच ८०%पेक्षा कमी वसुली असणाऱ्या बँकासाठी गव्हर्नमेंट गॅरन्टी घेणे आवश्यक असले व गव्हर्नमेंट गॅरन्टी नसल्यास राज्य बँकेकडून ११.५०टक्के ऐवजी १३.५० टक्के दराने फेर कर्ज उपलब्ध होते. या गव्हर्नमेंट गॅरन्टी बाबतची अट शिथील करण्यांत यावी व तसा प्रस्ताव राज्य बँक व नाबार्ड यांचेकडे मंजूरीकरिता ठरावासह पाठविण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते ठरले.

विषय क्रमांक १६(८) :- बँकेचे संचालक मा.श्री.श्रावणजी निमजे यांचे मृत्युमुळे रिक्त झालेल्या जागी स्विकृत करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १६(८) - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे मा. संचालक श्री श्रावणजी निमजे ह्यांचे दिनांक १५।४।२००० ला अकस्मात निधन झाले त्यांचे निधनामुळे बँकेचे एक संचालक पद रिक्त झालेले आहे. बँकेच्या उपविधील, उपविधी क्रमांक २५(४), पान क्रमांक १५ वर अशा प्रकारे रिक्त झालेले पद, रिक्त झाल्याचे तारखेपासून तीन महिन्याचे आंत भरणे आवश्यक आहे महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था समिती निवडणुका नियम १९७१ च्या नियम क्रमांक ७२नुसार अशाप्रकारे रिक्त झालेल्या पहिल्या दोन रिक्त जागा समितीच्या उर्वरित सदस्यांच्या सभेत स्विकृतीने भरण्यांत येतील अशी तरतुद आहे.

विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. संचालक मा.श्री. विश्वनाथजी यांनी चर्चेत भाग घेतांना सांगितले की, याबाबत फेरनिवडणुक घेण्यांत यावी. यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी सांगितले की, याबाबत फेर निवडणूक घेण्याची गरज नाही. बँकेच्या माननीय संचालक मंडळास स्विकृत सदस्य घेण्याचे अधिकार आहेत. याबाबत कायदेशिर तज्ञाचे मत घेण्यांत आलेले आहे. त्याप्रमाणे आजचे मा. संचालक मंडळाचे सभेत याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.

सविस्तर चर्चेअंती श्री श्रावणजी निमजे यांचे मृत्युमुळे रिक्त झालेल्या जागी श्री मोरबाजी निमजे यांना स्विकृत सदस्य म्हणून घेण्यांत यावे असे संचालक मा.श्री. बेग साहेब यांनी सुचविले, व या सुचनेला मा. संचालक, श्री रमेशकुमार निमजे यांनी अनुमोदन दिले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १६(१०) - नाबार्डनी मंजूर केलेली पुनर्गठन योजना कार्यान्वित करण्याबाबत.

ठराव क्रमांक १६(१०) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, नागपूर जिल्ह्यातील सेवा सह० संस्थांच्या मुद्दलापेक्षा व्याज झालेल्या थकबाकीदार सभासदांचे पुनर्गठन करून त्यांना नव्याने कर्ज उपलब्ध करून देण्याबाबतचे प्रपोजल बँकेनी तयार करून नाबार्डचे मान्यतेकरिता नाबार्डकडे सादर केले होते. बँकेने सादर केलेल्या प्रकरणावर कांही अटी घालून दिनांक ४ जानेवारी २००० ला मंजूरी प्रदान केली आहे.

या योजनेबाबत सभेला माहिती देतांना मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, ही योजना दोन भागांत विभागलेली आहे. पहिल्या भागांत निव्वळ अल्पमुदती कर्ज घेणारे (पिक कर्ज) थकबाकीदार सभासद असून त्यांची संख्या ७३२२ आहे. त्यांचेकडील कर्ज गठनाची रक्कम रुपये ४.६१ कोटी आहे. तसेच दुसऱ्या विभागांत अल्पमुदती पिक कर्ज सोबतच मध्यम मुदती व दिर्घमुदती कर्ज घेणारे थकबाकीदार सभासद असून त्यांची संख्या ४६०९ आहे. व त्यांचेकडील पुनर्गठनाची रक्कम एकूण रुपये १.३१ कोटी आहे. ही योजना कार्यान्वित करावयाची झाल्यास टप्पा टप्प्याने करावी लागेल व यासाठी प्रथमतः फक्त अल्प मुदती पिक कर्ज घेणारे थकबाकीदारांच्या समावेश करून त्यांना प्रथम पुनर्गठनाच्या लाभ देऊन नविन पिक कर्ज उपलब्ध करून द्यावे लागेल. व याच्या अनुभव लक्षांत घेऊनच पुढील टप्प्याबाबत कार्यवाही करणे संबंधीत विचार करण्यांत यावा.

चर्चेअंती असे ठरविण्यांत आले की, प्रथम पहिल्या टप्प्यासाठी ५४१ संस्थांच्या ७३२२ सभासदांसाठी मुद्दल रुपये २.१२ कोटी व व्याज रुपये २.४९ कोटी असे एकूण रुपये ४.६१ कोटीचे निव्वळ अल्प मुदती पिक कर्ज रकमेचे पुनर्गठण करण्यास मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १६(११) - बँकेत स्टॉफींग पॅटर्न मध्ये सुधारणा करणेबाबत.

ठराव क्रमांक १६(११) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना बँकेच्या व्यवस्थापनांत म्हणजेच

संचालक मंडळाच्या कामकाजांत भाग घेवून संचालक मंडळापुढे येणाऱ्या विविध विषयावर आपले मत मांडता यावे याकरिता बँकेत कार्यकारी संचालकाचे पद निर्माण करणेकरिता व याबाबत पोटनियमांत दुरुस्ती करणेकरिता कळविले असून दोनदा स्मरण पत्र दिले आहे. त्यानुसार बँकेचा स्टॉफींग पॅटर्न तयार करावा लागेल सध्या असलेल्या स्टॉफींग पॅटर्न मधील मुख्याधिकारी व उपमुख्याधिकारी ह्या दोन्ही श्रेणी रद्द करून त्या ऐवजी अनुक्रमे व्यवस्थापक व सहायक व्यवस्थापक ह्या श्रेणी निर्माण कराव्या असे वाटते. या प्रमाणे सुधारणा केल्यास कार्यकारी संचालक हे बँकेतील मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून राहील.

विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. चर्चेत भाग घेतांना संचालक मा. श्री. तायवाडे म्हणाले की, पुर्वी जसे विभागीय अधिकारी विभाग प्रमुख म्हणून कार्य करीत होते त्याप्रमाणे आता रिजनल मॅनेजर म्हणून देण्यांत यावे. त्याचे मतास मा॰ संचालक श्री गुजर यांनी अनुमोदन दिले. सविस्तर चर्चेअंती कार्यालयाने तयार केलेल्या सुधारीत स्टॉफींग पॅटर्नला मंजूरी देण्यांत येवून हे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सेवक उपसमितीपुढे ठेवण्यांत यावे. तसेच सुधारीत पॅटर्नमध्ये निर्माण केलेले मुख्य कार्यकारी संचालक यांची कर्तव्य, अधिकार व जबाबदारी ठरवून त्यास सेवक उपसमितीची मान्यता घेण्यांत यावी व त्याप्रमाणे बायलॉज दुरुस्तीकरिता हा विषय सेवक उपसमितीचे शिफारसह संचालक मंडळाचे सभेत ठेवण्यांत यावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १६(१२) सन १९९९-२०००चे वसुलीची माहिती मा. संचालक मंडळाचे सभेपुढे ठेवणे.

ठराव क्रमांक १६(१२) – मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती दिली की, दिनांक ३१.३.२००० अखेरची वसुलीची माहिती शाखा स्तरावरून मुख्य कार्यालयास प्राप्त झाली असून सन १९९९-२०००ची एकूण कर्ज मागणी रूपये १००६२.४८ लाख आहे. त्यापैकी थकित कर्ज मागणी रूपये ५६९०.५० लाख असून चालू कर्ज मागणी रूपये ४३७१.३८ लाख आहे त्यापैकी थकित कर्ज वसुली रूपये १४५१.२९ लाख व चालु कर्जाची वसुली रूपये ४६३.४८ लाख एवढी झालेली आहे. या वसुलीपैकी कापसातून रूपये ९३०.३६ लाख परस्पर वसुली झालेली आहे. कर्ज मागणीशी कर्ज वसुलीचे प्रमाण १९.३२ टक्के आहे. बँकेला वसुलीची सिझनॉलिटी डिसिप्लिनसाठी मार्च अखेर कमीत कमी ३०% व जून अखेर ४०%

वसुली जरूरी असले. त्यासाठी मार्च अखेरची वसुलीची सिझनालीटी डिसीप्लीन बँकेला प्राप्त करता आली नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन जून अखेर पर्यंत जास्तीत जास्त कर्ज वसुली करून जून अखेरची वसुली सिझनालीटी डिसीप्लीन प्राप्त करण्याचे प्रयत्न करण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर मा० अध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेचा वृत्तांत येणे प्रमाणे.

मा० संचालक श्री बंग यांनी सांगितले की, बँकेनी शेतघरा करिता कर्ज वाटप व कर्ज मंजूरी स्थिगित केलेली आहे. त्यामुळे गरजू शेतकऱ्यांना अडचण निर्माण झालेली आहे. गरजू शेतकऱ्यांची अडचण विचारांत घेता शेतघराकरिता कर्जवाटप पुर्ववत सुरु करण्यांत यावे. तसेच याकरिता कर्जाची लिमीट रुपये ५०,०००/- वरून वाढवून रुपये ६०,०००/- करण्यांत यावी. यावर सभेत चर्चा होऊन शेतघरा करिता कर्ज वाटप पुर्ववत सुरु करण्यांत यावे व घर कर्जाची लिमीट रुपये ५०,०००/- वरून रुपये ६०,०००/- करण्यांत यावे असे ठरले.

मा० संचालक श्री शाहीर यांनी सांगितले की, ज्या विणकर संस्था अर्थक्षम आहेत व ज्यांचा व्यवहार चांगला आहे अशा संस्थांना बँकेनी कर्ज मर्यादा वाढवून देण्याबाबत सभेला विनंती केली. याबाबत सविस्तर माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्यांत येईल असे मा. अध्यक्ष यांनी सांगितले.

मा० संचालक श्री समर्थ यांना बँकेच्या वसुलीकरिता जीपगाड्यां वर किती खर्च झाला व किती वसुली झाली याबाबत सभेला माहिती देण्यांत यावी असे सांगितले. यावर मा० अध्यक्ष म्हणाले की, दरवर्षी जून अखेर झालेली कर्ज वसुली अंतीम करण्यांत येते, व त्याकरिता झालेला खर्च सुध्दा काढण्यांत येतो. त्याप्रमाणे जून अखेर वसुली कामाकरिता जीपगाड्यांवर झालेला खर्च व झालेली वसुली याबाबतची माहिती घेऊन संचालक मंडळाचे सभेत ठेवण्यांत येईल.

यानंतर मा० संचालक श्री शाहीर यांनी कर्मचाऱ्यांचे वेतना बाबत वेज बोर्डाचा जो निकाल झाला त्यावर बँकेने कोणती भूमिका घेतली याबाबत प्रश्न उपस्थित केला. सदर प्रश्न हा कर्मचाऱ्यांशी निगडीत व महत्वाचा असल्याने यावर संबंधीतांशी चर्चा करून निर्णय

घेण्यांत यावा असे प्रतिपादन केले. तसेच मा० संचालक श्री बबनरावजी तायवाडे यांनी सुध्दा त्यांचे मताला दुजोरा दिला. व हा प्रश्न त्वरित निकालीत काढण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले व याबाबतची माहिती संचालक मंडळासमोर ठेवावी. व त्यावर विचार विनिमय करून त्वरित निर्णय घेण्याकरिता मा० संचालक मंडळाची सभा दिनांक १०-०८-२००० रोजी बोलाविण्यात यावी असे सांगितले.

यावर सविस्तर चर्चा करण्यांत येवून या विषयाचे गांभीर्य विचारात घेवुन मा० संचालक मंडळाची सभा सोमवार दिनांक १०-०८-२००० रोजी सकाळी ११.०० वाजता बोलाविण्यांत यावी व या सभेत निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

यावर मा० अध्यक्ष यांनी वेज बोर्डाचे निवाड्यावर विचार विनिमय करण्यासाठी दिनांक १०-०८-२००० रोजी सकाळी ११.०० वाजता मा० संचालक मंडळाची सभा बोलाविण्यांत येईल असे सांगितले.

यानंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर कोणतेही विषय नसल्यामुळे सभेला उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक          अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. नागपूर.

बँकेच्या मा० संचालक मंडळाची सभा सोमवार दि० १०.४.२००० रोजी सकाळी ११.०० वाजता बँकेच्या सावनेर शाखेच्या कार्यालयांत मा० श्री० सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

– उपस्थित –

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनिल केदार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. भा. चं. शहाणे | संचालक |
| ३. | मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ४. | मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ५. | मा. श्री. सं. लि. चोरे | " |
| ६. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| ७. | मा. श्री. वि. रा. हुलके | " |
| ८. | मा. श्री. ना. र. जमिकाटे | " |
| ९. | मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १०. | मा. श्री. ग. के. शाहिर | " |
| ११. | मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १२. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | " |
| १३. | मा. श्री. मु. भि. पन्नासे | " |
| १४. | मा. श्री. भ. शं. धार्मीक | " |
| १५. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| १६. | मा. सौ. स्मिताताई कुंभारे | संचालीका |
| १७. | मा. सौ. कुसुमताई किंमतकर | " |
| १८. | मा. श्री. वी. जी. शहाणे | कर्मचारी प्रतिनिधी |
| १९. | मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

– अनुपस्थित –

| | | |
|---|---|---|
| १. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| २. | मा. श्री. र. पां. गावंडे | संचालक |
| ३. | मा. श्री. र. गो. बंग | " |
| ४. | मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ५. | मा. श्री. चं. ठ. कोल्हे | " |
| ६. | मा. श्री. आ. र. देशमुख | " |
| ७. | मा. श्री. वि. आ. राउत | " |
| ८. | मा. श्री. व. क. पारशिवनिकर | " |

९. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर.
१०. मा. प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य सह. बँक मर्या., मुंबई.
११. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
१२. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (बँक), नागपूर.
१३. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
१४. मा. विभागीय अधिकारी, महा. राज्य सह. बँक मर्या., विभा. कार्यालय, नागपूर.
१५. मा. श्री. एल. जी. चौधरी – कर्मचारी प्रतिनिधी.

---

सुरुवातीला सभेला अनुपस्थित असलेले मा. सौ. आशाताई महाजन उपाध्यक्षा, श्री र. पां. गावंडे, श्री र. गो. बेग, श्री. अ. रा. गुप्ता, श्री चं. ल. कोल्हे श्री. आ. र. देशमुख, श्री. वि. ना. राऊत, व श्री व. क. पारशिवनीकर, सर्व संचालक यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

यानंतर उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांनी विषयपत्रिके वरील विषयानुसार कार्यवाही सुरु केली.

विषय क्रमांक १ – मागील दिनांक ८.४.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक ८.४.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक २ – मा. वेज बोर्डाने दिलेल्या निवाड्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक २ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मान्यताप्राप्त युनियनने कर्मचाऱ्यांच्या पगारवाढी व इतर आर्थिक मागण्या संदर्भात बँकेविरुध्द दाखल केलेल्या केसचा निकाल दिनांक २९.२.२००० ला मा. वेज बोर्ड, मुंबई यांनी दिला असून, त्याची प्रत बँकेला दिनांक ८.३.२००० ला प्राप्त झाली आहे.

मा. वेज बोर्डाने दिलेल्या निकालाचे अवलोकन केल्यास वेज बोर्डाने पगारवाढीबाबत मंजूर केलेल्या मागण्यांपैकी ज्या मागण्या मंजूर केलेल्या आहेत, त्या मागण्या मंजूर करण्यामागची वेज बोर्डाची भूमीका किंवा स्पष्टीकरण सदर आदेशांत नाही, त्यामुळे वेज बोर्डाने सदर प्रकरण निकालांत काढतांना कोणकोणत्या बाबींच्या प्रामुख्याने विचार केला हे समजणे कठीण आहे.